सिटीझन रिपोर्टर
बनण्याची सुवर्ण संधी
संपर्क करा
०२२ ६९७१ १८९०
dailylokrakshanay@gmail.com

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सिटीझन रिपोर्टर
बनण्याची सुवर्ण संधी
संपर्क करा
०२२ ६९७१ १८९०
dailylokrakshanay@gmail.com

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक ९७ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शुक्रवार, २३ ऑगस्ट २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## आठवडाभरातच १२ घटना, शालेय मुलींवरील अत्याचाराने हादरला 'पुरोगामी महाराष्ट्र'



● ठाणे, रोहित जैसवार :

बदलापूरमध्ये एका शाळेत २ अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घटना घडली आहे. या घटनेचं तीव्र पडसाद मुंबईसह राज्यभर उमटताहेत. अत्याचाराच्या घटना वाढत असून घृणास्पद कृत्य करणाऱ्यांच्या मनात कायद्याची भीती राहिली नाही का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, राज्यात गेल्या काही दिवसांमध्ये बलात्कार, लैंगिक अत्याच्याराच्या घटनांमध्ये झपाट्यानं वाढ होतानाचं भयावह चित्र आहे.

अकोल्यातील शिक्षकाकडून सहा मुलींचा विनयभंग - २० ऑगस्टला उघड

अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातल्या काजीखेड येथे जिल्हा परिषदेच्या उच्च माध्यमिक शाळेत एका शिक्षकाने अश्लिल व्हिडिओ दाखवत सहा विद्यार्थीनींचा छळ केल्याची ही घटना आहे. ही खळबळजनक घटना आज मंगळवारी संध्याकाळी उघडकीस आली. याप्रकाराने जिल्हाभरात सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.

कळवा रुग्णालय परिसरातील गार्डनमध्ये एका अल्पवयीन गतिमंद मुलीचा विनयभंगा करण्यात आला. विनयभंग केल्यानंतर आरोपीला ताब्यात घेण्यात आलं होतं. या प्रकरणी कळवा पोलिस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी सीसीटिव्ही व तांत्रिक माहितीच्या मदतीने आरोपीला अटक केली आहे. प्रदीप शेळके असं आरोपीचं नाव आहे. कळवा रुग्णालय हे ठाण्याचे एकमेव सरकारी रुग्णालय आहे.

साडेचार वर्षे मुलीचे अपहरण करून अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील वावी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घटना घडली आहे. चिमुकली घरासमोर खेळत असताना अपहरण करून तिच्यावर अत्याचार केले. त्याच गावात राहणाऱ्या संशयिताने मुलीची अपहरण करून अत्याचार केल्याची प्राथमिक माहिती आहे. मुलीच्या नातेवाईकांनी पोलिसात तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी शोध घेत मुलीची केली सुटका तर संशयित आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले.

पान २ वर

### बदलापूरातील शाळेत २ चिमुकल्यांवर अत्याचार - १३ ऑगस्ट

■ 12 ऑगस्ट रोजी बदलापूर पूर्व येथील एका नामांकित शाळेत तीन वर्षे आठ महिन्यांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यात आला. त्यानंतर 13 ऑगस्ट रोजी पुन्हा सहा वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यात आला. यातील एका मुलीने शारीरिक त्रास होत असल्याचं आपल्या आजोबांना सांगितलं. असाच त्रास मैत्रिणीसोबतही होतोय, असंही या मुलीने सांगितलं. त्यानंतर या मुलीच्या पालकांनी दुसऱ्या मुलीच्या पालकांना संपर्क केला, तर दुसरी मुलगीही शाळेत जाण्यास तयार नसल्याचं त्यांना समजलं. दोन्ही मुलींची वैद्यकीय तपासणी केल्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचं उघड झालं

### पुण्यातील नामांकित शाळेत अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न -१५ ऑगस्ट

■ पुण्यातील भवानी पेठेत हे एक नामांकित शाळा आहे. स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी पीडित मुलगी शाळेत तिची स्कूल बॅग शोधण्यासाठी गेली होती. यावेळी आरोपी तरुण हा मुलांच्या स्वच्छतागृहाजवळ थांबला होता. पीडित मुलगी जवळ येताच आरोपीने तिचा हात पकडत तिला जबरदस्तीने स्वच्छतागृहात ओढत घेऊन गेला. यावेळी आरोपीने तिच्या मनाला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. मात्र पीडित अल्पवयीन मुलीने आपली सुटका करून घेत पळ काढला. घरी केल्यानंतर तिने आईला हा संपूर्ण प्रकार सांगितला.

## थोडक्यात

### इक्बालसिंह चहल यांची बदली

● मुंबई, विशाल कारंडे :



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जवळचे अधिकारी अशी ओळख असलेले IAS इक्बालसिंह चहल यांची बदली झाली आहे. इक्बालसिंह चहल यांना आता गृह विभागाचे अपर मुख्य सचिव म्हणून नियुक्त करण्यात आलं आहे. चहल यांच्याकडे सध्या मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव म्हणून कार्यभार होता. त्यांची बदली होऊन आता ते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गृहविभागाचे अपर मुख्य सचिव म्हणून कार्यभार सांभाळतील.बदलापूरमधील अत्याचार प्रकरणाने राज्यात संतापाची लाट उसळली आहे. तसेच गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यामुळे विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना चांगलेच कोंडीत पकडले आहे. या पार्श्वभूमीवर इक्बालसिंह चहल यांची गृह खात्याच्या अप्पर मुख्य सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

पान २ वर

### नालासोपारामध्ये ७ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न

● नालासोपारा, सुचिता सोनावणे :

नालासोपाऱ्यात ७ वर्षीय मुलीचा विनयभंग, तसेच लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न झाल्याची घटना समोर आलीय. विशेष म्हणजे तक्रार करण्यासाठी ११२ वर संपर्क साधला असता, कोणत्याच प्रकरची मदत मिळाली नाही. पीडितेच्या नातेवाईकांना पोलीस स्टेशनमध्ये जा असं सागंण्यात आला होतं. राज्यात महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर असतांनाच पोलिसांचा निष्काळाजीपणा समोर आलाय.
मिरा भाईंदर वसई विरार पोलिसांचा ढिसाळ कारभार समोर आलाय. हाती आलेल्या माहितीनुसार, नालासोपाऱ्यात एका सात वर्षाच्या मुलीचा विनयभंग करत तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न झाल्याची घटना घडली. ही घटना दोन दिवसापूर्वी घडली, मात्र पोलिसांनी दोन दिवसानंतर गुन्हा दाखल केल्याची बाब समोर आल्यानं पोलीस यंत्रणेवर प्रश्न निर्माण होत आहे. तक्रार नोंदवण्यासाठी पोलीस मदतीसाठी ११२ वर फोन केला असता,पोलीस ठाण्यात जा असे उत्तर देण्यात आल्याचा आरोप पीडितेच्या नातेवाईकांनी केलाय.

पान २ वर

## फेरीवाल्यांवर कठोर कारवाईसाठी पालिकेची तयारी

### अतिक्रमण निर्मूलन निरीक्षकांची ११८ पदे भरणार

● मुंबई, विशाल कारंडे :





येत्या काळात मुंबईतील फेरीवाल्यांवरील कारवाई अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. मुंबई महापालिका प्रशासनाने अतिक्रमण निर्मूलन निरीक्षकांची ११८ पदे भरण्याचे ठरवले आहे. लिपिक वर्गातून अंतर्गत भरतीद्वारे ही पदे भरली जातील. फेरीवाल्यांच्या विषयावरून उच्च न्यायालयाने महापालिकेला फटकारल्यानंतर जून महिन्यात प्रशासनाने मुंबईत फेरीवाल्यांविरोधात कारवाई सुरू केली होती. या कारवाईसाठी पालिकेने वीस महत्त्वाची ठिकाणे निश्चित केली होती. त्यात चर्चगेट, सीएसएमटी परिसर, कुलाबा, दादर स्थानक परिसर, अंधेरी, बोरीवली अशा महत्त्वाच्या ठिकाणच्या कारवाईवर भर देण्यात आला होता. मात्र गेल्या काही दिवसांपासून ही कारवाई थंडावली असून फेरीवाले पुन्हा दिसू लागले आहेत.

पान २ वर

## बदलापूरची शाळा RSS च्या विचारांची असल्याने पोलिसांवर दबाव, CCTV फुटेज गायब; नाना पटोलेंचा गंभीर आरोप

● नंदुरबार, नितीन देवळेकर :



बदलापूरमधील एका शाळेत १३ ऑगस्ट रोजी दोन चिमुरड्या मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना घडली. या घटनेनंतर राज्यभरातून संताप व्यक्त केला जात आहे. यावर बोलताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी गंभीर आरोप केला आहे. बदलापूरची शाळा भाजपा आणि आरएसएसच्या विचारांची असल्याने पोलिसांवर दबाव टाकण्यात आला, असे त्यांनी म्हटले आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी नंदुरबार येथे पत्रकारांशी संवाद साधताना राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. त्यांनी म्हटलंय की, महाराष्ट्र हा गुजरात धार्जिणा करण्याचा सत्ताधाऱ्यांकडून प्रयत्न सुरु आहे. बदलापूरची शाळा भाजपा आणि आरएसएसच्या विचारांची असल्याने पोलिसांवर दबाव आहे. शाळेतले सीसीटीव्ही फुटेज गायब केले गेले. मुख्यमंत्री बदलापूरला जाऊन त्यांनी प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला, असा गंभीर आरोप नाना पटोलेंनी केला आहे.

पान २ वर

## ब्रिटनचा बिल गेट्स (माईक लिंच) व १८ वर्षीय लेकीचा मृतदेह मिळाला



● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

इटलीतील सिसिली बेटाजवळ सोमवारी वादळामुळे बसियनची एक लक्झरी नौका बुडाली. १८४ फूट लांबीची बायेसियन नौका समुद्रात ५० मीटर खोलवर सापडली. यॉटमध्ये ५ जणांचे मृतदेह सापडले आहेत. ब्रिटीश वेबसाइट द टेलिग्राफनुसार सापडलेल्या मृतदेहांमध्ये प्रसिद्ध ऑनलाइन सॉफ्टवेअर व्यावसायिक माईक लिंच आणि त्यांची १८ वर्षांची मुलगी हन्ना यांचाही समावेश आहे. मॉर्गन स्टॅनले इंटरनॅशनलचे अध्यक्ष जोनाथन ब्लुमर आणि त्यांची पत्नीही या नौकेवर होते. त्यांच्या मृत्यूची पुष्टी झालेली नाही. रात्र झाल्यामुळे बचावकार्य थांबले होते. आज गुरुवारीही मृतदेह बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरु आहेत. बायेसियन यॉटमध्ये अमेरिका, युनायटेड स्टेट्स आणि कॅनडाचे १२ क्रू मेंबर्स आणि २२ लोक होते. नौका बुडाल्यानंतर १५ जणांना वाचवले.

पान २ वर

## शरद पवारांना केंद्राची Z+ सुरक्षा

● मुंबई, यश सावंत :



येत्या काही महिन्यात महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. त्यापूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेस शदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांना केंद्र सरकारनं 'झेड प्लस' सुरक्षा प्रदान केली आहे. पवारांना मिळत असलेल्या धमकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहखात्यानं हा निर्णय घेतल्याचं बोललं जात आहे. सध्या शरद पवार यांना राज्याची झेड प्लस सुरक्षा आहे. केंद्रानं शरद पवार यांना झेड प्लस सुरक्षा देण्याचा निर्णय घेतल्यानंतर विविध चर्चा सुरू झाल्या. केंद्रीय गृहमंत्रालयानं केंद्रीय राखीव पोलीस दलाला (सीआरपीएफ) शरद पवार यांना झेड प्लस सुरक्षा देण्यास सांगितलं आहे. शरद पवार हे देशातील महत्वाचे नेते आहेत. या कामासाठी ५५ सशस्त्र CRPF जवानांची तुकडी तैनात करण्यात येणार आहे. ते शरद पवार यांच्या ताफ्यात तैनात असणार आहेत. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला राज्यातील जनतेनं पाठिंबा दिला होता. येत्या २-३ महिन्यात महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका होत आहेत. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्रात आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा आणि ओबीसी समाजात राजकीय नेत्यांबद्दल नाराजी आहे. त्यामुळं कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी खबरदारी घेण्यात येत आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी सीआरपीएफच्या अधिकाऱ्यांनी शरद पवार यांच्या कार्यालयात सुरक्षा चाचपणी केली होती.

पान २ वर

## दहीहंडीला दोन बियर फ्री, वादग्रस्त जाहिरातीनंतर हिंदू आक्रमक





● सिंधुदुर्ग , दिगंबर जाधव :

सण, उत्सव म्हटलं की लोकांमध्ये उत्साह असतो, वेगळाच आनंद आणि उत्सवाची तयारीदेखील सुरु असते. या उत्सवात सहभागी होण्यासाठी सर्वचजण आपलं योगदान देत असतात. या काळात मार्केटमध्ये तेजी पाहायला मिळते, बाजारात खरेदीसाठी रेलचेल असते तर दुकानदार किंवा विक्रेत्यांकडून विविध ऑफर देण्यात येतात. नुकतेच रक्षाबंधन सणाचा उत्साह देशभर पाहायला मिळाला. महाराष्ट्रात राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेमुळे यंदाचा रक्षाबंधन सण मोठ्या उत्साहात आणि बहिणींना आनंद देणारा ठरला.

पान २ वर

## निती आयोगाकडून एमएमआर विकास अहवाल मुख्यमंत्र्यांना सादर

■ पाच वर्षांत एमएमआरचा जीडीपी दुप्पट करण्याचे उद्दिष्ट - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे
■ सात क्षेत्रांवर लक्ष केंद्रीत करून २०३० पर्यंत मुंबईचा जीडीपी २६ लाख कोटी होणार



● मुंबई, विशाल पाटील :

मुंबई महानगर आणि परिसर जागतिक आर्थिक केंद्र बनविण्यासाठी निती आयोगाने केलेल्या अभ्यासाचा अहवाल आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुपूर्द करण्यात आला. मुंबईचे सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) पाच वर्षांत दुप्पट करण्यासाठी सात विविध क्षेत्रांवर निती आयोगाने लक्ष केंद्रीत केले आहे. राज्याचा विकास हा दळण वळण आणि संपर्काच्या पायाभूत सुविधांवर अवलंबून असतो त्याच दृष्टीने राज्यात कामे सुरू आहेत. उद्योजकांची देखील महाराष्ट्राला पसंती असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले.

वर्षा निवासस्थानी निती आयोगासमवेत झालेल्या बैठकीस मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, निती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रमण्यम, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव डॉ. आय. एस. चहल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी, निती आयोगाचे ओ पी अग्रवाल, प्रधान आर्थिक सल्लागार ॲना रॉय, शिरीष संखे, यांच्यासह मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

पान २ वर

"निती आयोगाने केलेल्या अभ्यासात मुंबई महानगरासह पालघर, रायगड, ठाणे या जिल्ह्यांचा समावेश असलेल्या परिसराचा विकासाचे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवण्यात आले आहे. सध्या या परिसराचे सकल देशांतर्गत उत्पादन १२ लाख कोटी (१४० बिलियन डॉलर) असून ते उत्तरप्रदेश राज्याच्या ८० टक्के एवढे आहे. मुंबई आणि महानगर परिसराचा जीडीपी २०३० पर्यंत २६ लाख कोटी (३०० बिलियन डॉलर) करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे श्री. सुब्रमण्यम् यांनी सांगितले. मुंबईत सध्या सुमारे १ कोटी रोजगार असून सुमारे ३० लाख रोजगार अजून निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्याचे निती आयोगाने नमुद केले आहे. त्यासाठी सात विकास क्षेत्रांवर लक्ष केंद्रीत करण्यात येणार असून त्यामध्ये खासगी क्षेत्रामध्ये १० ते ११ लाख कोटी गुंतवणुक व्हावी यासाठी प्रयत्न करण्यात येणार असून शहरांना ग्रोथ इंजिन करण्यावर भर देण्यात येणार आहे.

## कोल्हापूर हादरलं! बिहारी जोडप्याच्या अल्पवयीन मुलीची हत्या



● कोल्हापूर, सचिन कदम :

पश्चिम बंगालची राजधानी कोलकात्यात डॉक्टर महिलेवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्याच्या घटनेनंतर राज्यातील ठाणे जिल्ह्यातील बदलापूरमध्ये शाळेत दोन चिमुरड्या मुलींवर अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली होती. इतरही काही अशाच प्रकारच्या घटना उघडकीस येत आहेत. या घटनांनंतर राज्यात लोकांचा या नराधमांच्या विरोधात उद्रेक निर्माण झालाय. आता याच घटनांची पुनरावृत्ती कोल्हापूर जिल्ह्यातील शिये गावात घडली असून गावातील रामनगर परिसरातील शेतवडीत १० वर्षीय अल्पवयीन मुलीचा मृतदेह आढळल्यानं जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. लैंगिक अत्याचार करून अल्पवयीन मुलीची हत्या करण्यात आली असल्याचा प्राथमिक अंदाज जिल्हा पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी व्यक्त केलाय. कामानिमित्त आलेल्या बिहारी जोडप्याची ही मुलगी आहे.

कोल्हापुरातील शिये गावातील रामनगर परिसरामध्ये ही धक्कादायक घटना उघडकीस आली. अल्पवयीन मुलगी बुधवार (२१ ऑगस्ट) दुपारपासून बेपत्ता असल्याची तक्रार तिच्या पालकांनी शिरोली एमआयडीसी पोलिसात दिली होती. पोलिसांनी काल दुपारपासून शोध मोहीम राबवली. मात्र, मुलीचा पत्ता लागला नाही. त्यानंतर आज सकाळी ही शोध मोहीम पुन्हा सुरू करण्यात आली. यासाठी पोलिसांनी श्वान पथकाला पाचारण केलं होतं.

पान २ वर

## संपादकीय

# शिक्षण हक्काचे सार आपल्याला समजलेच नाही!

घोड्याला पाण्यापर्यंत नेता येते, पण पाणी त्याचे त्यालाच प्यावे लागते. प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत आपल्या व्यवस्थेचे वर्तन या पाणी पिण्याचेही कष्ट घेण्यास तयार नसलेल्या घोड्यासारखे होते. तब्बल एक शतकभर सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची अंमलबजावणी करण्यात अक्षम्य टाळाटाळ करण्यात आली. आता शिक्षण हक्क कायदा संमत होऊन एक दशक लोटले, तरीही त्याच्या काटेकोर अंमलबजावणीत चालढकल सुरू आहे.

संसदेने संमत केलेला शालेय शिक्षणाविषयीचा हा पहिलाच आणि ऐतिहासिक कायदा होता. तो संमत होणे हे कोट्यवधी विद्यार्थ्यांसाठी आश्वासक पाऊल होते. भारताच्या सामाजिक इतिहासात एक नवा अध्याय सुरू होणार होता. विविध राज्यांतील नियम आणि अंमलबजावणीच्या स्वरूपात तफावत असली, तरीही सुरुवातीला भविष्य उज्ज्वल असल्याच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या. प्राथमिक शिक्षण आणि इतर बाल हक्कांना अखेर सामाजिक मान्यता मिळाल्याचे आनंददायी चित्र स्पष्ट दिसू लागले होते.

मात्र पुढे विविध राज्यांतील सरकारांनी शिक्षण हक्काची वाट भरकटवण्यासाठी कसे डाव खेळले हे मुंबई उच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या निकालातून अधोरेखित झाले. राज्य सरकारने वर्षाच्या सुरुवातीला दिलेला आदेश न्यायालयाने रद्दबातल ठरविला. या आदेशान्वये आर्थिकदृष्ट्या दुर्बळ गटातील विद्यार्थ्यांना शिक्षण हक्क नाकारण्याचा प्रयत्न या करण्यात आला होता. या कायद्यातील एका महत्त्वाच्या तरतुदीला बगल देण्याचा हा डाव होता. या आदेशाच्या माध्यमातून शिक्षण हक्का अंतर्गत विनाअनुदानीत खासगी शाळांतील एक चतुर्थांश जागा राखीव ठेवण्याची अट आडवाटेने रद्द करण्यात आली होती. ज्या खासगी शाळांच्या एक किलोमीटर परिघात सरकारी शाळा असेल, त्या शाळांवर शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी करण्याची सक्ती असणार नाही, असे राज्य सरकारच्या आदेशात नमूद करण्यात आले होते.

जिथे नोकशाहीने अशी नामी शक्कल लढविली, असे महाराष्ट्र हे एकमेव राज्य नव्हते. सरकारने या आदेशाच्या समर्थनार्थ दोन प्रतिवाद केले. पहिला होता संसाधनांविषयीचा. सरकारी शाळांत सहज प्रवेश मिळतच असेल, तर खासगी शाळांत त्याचीच पुनरावृत्ती कशासाठी? मात्र या प्रतिवादामागे एक आर्थिक कारण दडलेले होते. ज्या खासगी शाळा शिक्षण हक्काअंतर्गत प्रवेश देतात, त्यांना सरकारकडून आर्थिक मोबदला दिला जातो. सरकारच्या प्रतिवादाची पाळेमुळे मुद्द्यात होती. सरकारला प्रत्येक विद्यार्थ्यांच्या शिक्षणशुल्काची पूर्ण रक्कम द्यावी लागत नसे, सरकारी शाळांत प्रत्येक विद्यार्थ्यांवर जेवढी रक्कम खर्च केली जाते, तेवढीच रक्कम खासगी शाळांना दिली जात असे. थोडक्यात हा खासगी शाळांसाठी तोट्याचा व्यवहार होता. सरकारचा खर्चाच्या पुनरावृत्तीचा दावा या नियमाशी संबंधीत आहे.

दुसरा प्रतिवाद खुद्द शिक्षण हक्क कायद्याविषयी होता. हा कायदा अन्य मूलभूत अधिकारांप्रमाणे निखालस नाही. हा तर्क बराच लोकप्रिय दिसतो. राज्य सरकार या तर्काचा वापर करून पळवाट शोधत होते. यातून संविधानात संसदेने केलेल्या सुधारणेची अंमलबजावणी करण्यासंदर्भातील उदासीनता त्यातून स्पष्ट होते. शिक्षण हक्काकडे निमसांविधानिक अधिकाराप्रमाणे पाहणारे महाराष्ट्र राज्य सरकार हे एकमेव नाही. ही वस्तुस्थिती भारतातील मुलांचा न्यायाच्या वाटेवरचा प्रवास किती खडतर आहे, हेच स्पष्ट करते. मुंबई उच्च न्यायालयाचा हा निकाल अन्य राज्य सरकारांना इशारा ठरतो. शिक्षण हक्काशी आणि त्यातील मार्गदर्शक तत्त्वांशी सुसंगत नसलेले बदल करण्याचा प्रयत्न फसू शकतो, ही खूणगाठ आता अन्य राज्यांनाही बांधावी लागेल. शिक्षण हक्क कायदा लागू करण्यात आला, तेव्हा त्यातून संवेदनाजागृती होईल, अशी अपेक्षा होती. प्रत्येक मुलाला शाळेत जाण्याचा अधिकार मिळालाच पाहिजे, या विचाराची अंमलबजावणी फार पूर्वीपासून प्रलंबित होती. गोपाल कृष्ण गोखले यांनी त्यासंदर्भातील प्रस्ताव १९११ साली मांडला होता. तेव्हा त्यांना त्यात यश आले नाही.



### आजची चित्रोळी

टंवकारूनी ते जगास बघतें
फांदीवरती जन्मूनियां !
मंद झुळूक वाऱ्याची येऊन
गंध जातों घेऊनियां !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

पान १ वरून...

### इक्बालसिंह चहल यांची बदली

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इक्बालसिंह चहल यांना मुंबईच्या आयुक्तपदावरून हटवण्यात आले होते. त्यांची नियुक्ती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अतिरिक्त सचिव म्हणून करण्यात आली होती. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार तीन वर्षांपेक्षा अधिक काळ एका पदावर, जिल्ह्यात किंवा मूळ गाव असलेल्या जिल्ह्यात कार्यरत असलेल्या निवडणुकीच्या कामाशी संबंधित अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे आदेश आयोगाने दिले होते. या आदेशानुसार इक्बालसिंह चहल यांची बदली करण्यात आली होती. चहल यांच्याकडे मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त सचिव पदाची जबाबदारी देण्यात आली होती. आता त्यांची बदली करण्यात आली आहे.

### नालासोपारामध्ये ७ वर्षीय मुलीवर लैंगिक...

पोलीस ठाण्यात गेले असता गुन्हा दाखल करू नका, असे सांगण्यात आलं. तुम्हाला त्रास होईल, मुलीला इथे तिथे तपासासाठी घेऊन जावे लागेल, असं पोलीस ठाण्यातील संबंधित अधिकाऱ्याने तक्रारदाराला सांगितल्याचं माहिती संबंधित व्यक्तींनी दिलीय. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी सकाळी १०.३० वाजता विनयभंगाची घटना घडली. त्यानंतर बुधवारी रात्री १ वाजता विनयभंग,पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. राज्यात महिला सुरक्षे प्रश्न ऐरणीवर असतांना पोलिसांनी या गंभीर प्रकरणी दोन दिवसानंतर गुन्हा दाखल का केला? त्यामुळे तुलिंज पोलिसांच्या कारभारावर प्रश्न उपस्थित होत आहे. या संदर्भात तुलिज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश नगरकर यांच्याशी या घटनेबाबत माहिती घेण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र त्यांनी कोणतीच माहिती दिली नाहीये.

### आठवडाभरातच १२ घटना, शालेय मुलींवरील...

साडेचार वर्षाच्या मुलीवर लैंगिक छेडछाडची लातूरतील घटना उघड - २० ऑगस्ट

चाकूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात साडेचार वर्षाच्या चिमुकल्या मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघड झाली आहे. चाकूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात १९ वर्षीय आरोपीच्या घरासमोर चार वर्ष दहा महिन्याची मुलगी राहत होती. १७ तारखेला आरोपीने मुलीवर लैंगिक अत्याचार केले होते. याची माहिती मुलीने आईला दिल्यानंतर त्या दोन कुटुंबात तुफान हाणामारी झाली. चाकूर पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस तात्काळ अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस करत आहे

कोल्हापुरात दहा वर्षाच्या मुलीवर बलात्कार करून हत्या -२२ ऑगस्ट

कोल्हापुरात दहा वर्षाच्या मुलीवर बलात्कार करून हत्या करण्यात आली आहे. कोल्हापूरच्या शिये गावातील राम नगर परिसरात धक्कादायक घटना घडली आहे. सबंधित मुलगी काल दुपारपासून बेपत्ता होती . दोघा संशयीताना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

मुंबईत अपंग अल्पवयीन मुलीवर अत्याचार -२१ ऑगस्ट

मुंबईत बुधवारी अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराचे आणखी एक प्रकरण समोर आले आहे. कांदिवली परिसरात घरात शिरलेल्या तरुणाने १४ वर्षांच्या अपंग मुलीचा विनयभंग केल्याची घटना भरदिवसा घडली आहे. या प्रकरणी एका आरोपीला कुरार पोलिसांनी अटक झाली आहे. घटनेच्या दिवशी मुलगी घरी एकटीच होती. तिचे आई-वडील कामावर गेले होते, त्यानंतर तिच्या एकटेपणाचा फायदा घेत आरोपीने जबरदस्तीने तिच्या घरात घुसून मुलीचा विनयभंग केला. यानंतर पीडित मुलगी घाबरली, काही दिवस मुलगी शांत असल्याचे तिच्या आईच्या लक्षात आले, आईने तिला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता. तिने घडलेला प्रकार सांगितला पीडित तरुणीने पोलिसांना दिलेल्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबईच्या खार दांडा परिसरात देखील अशीच एक संतापजनक घटना उजेडात आली आहे. यात दोन सख्या अल्पवयीन मुलींचां विनयभंग झाल्याचे धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी मुलींच्या आई वडिलांनी खार पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर आरोपी विरोधात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलाय. नागपूरच्या कामठी भागात आठ वर्षीय मुलीवर शेजाऱ्यानेच अत्याचार केला आहे. ५५ वर्षीय आरोपी धनीराम वासनिक याला पोलीसांनी अटक केली. चॉकलेट देण्याच्या आरोपीने पीडित मुलीला आपल्या घरी नेऊन कृत्य केले . त्यानंतर चाकूचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली होती . पीडितेने हा सर्व आईला सांगितल्यानंतर पोलिसांना माहिती देण्यात आली. त्या नंतर पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला आणि आरोपीला अटक केली. हा सगळा प्रकार एप्रिल महिन्यात घडला आहे. पीडित तरुणी आणि तिची मैत्रीण हे घराजवळ राहतात त्यामुळे त्यांची पहिल्यापासूनच ओळख होती. आरोपी मैत्रिणी हिने पीडित तरुणी हिला घेऊन तिच्या मित्रांसोबत पार्टी करण्यासाठी नेले. पीडित तरुणीला रिक्षात बसवून मैत्रिणीने तिच्या मित्रांना सुद्धा पार्टीसाठी बोलवले होते. मित्राच्या घरी हा सगळा प्रकार घडला. पार्टीच्या ठिकाणी गेल्यावर पीडित तरुणीला तिच्या मैत्रिणीने जबरदस्तीने तिला दारू पाजली आणि त्यानंतर तिच्या मित्रांनीच तिच्यावर बलात्कार केला. दारूच्या नशेत असलेल्या पिढीत तरुणीला या सगळ्या बाबत काहीच कल्पना नव्हती याचाच फायदा घेत एका तरुणाने या ठिकाणी या घटनेचा व्हिडिओ देखील मोबाईलवर रेकॉर्ड केला.

चांदिवलीमध्ये तीन वर्षाच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार - २० ऑगस्ट चांदिवलीतील संघर्ष नगर परिसरात राहणाऱ्या १६ वर्षाच्या कट्टरपंथीय युवकाने तीन वर्षाच्या कन्येवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. लैंगिक अत्याचार करणाऱ्या युवकाला, त्याच्या कृत्याची त्वरित शिक्षा मिळावी तसेच त्यावर अनुसूचीत जातीच्या मुलीचे शोषण केल्याबद्दल सुद्धा कायदेशीर कारवाई व्हावी, अशी मागणी पीडितेच्या आईने केली आहे. मंत्री लोढा यांनी या मागणीला अनुसरून प्रशासनाला त्वरित कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

### फेरीवाल्यांवर कठोर कारवाईसाठी पालिकेची तयारी

मनुष्यबळाअभावी या कारवाईत सातत्य ठेवणे अवघड बनले आहे. त्यामुळे पालिका प्रशासनाने अतिक्रमण निर्मूलन निरीक्षक (परवाना निरीक्षक) पदे भरण्याचे ठरवले आहे. सध्या पालिकेकडे २०७ परवाना निरीक्षक असून त्यात आणखी ११८ परवाना निरीक्षकांची पदे भरली जाणार आहेत. लिपिकांची परीक्षा प्रक्रिया पूर्ण करून त्यातून ही पदे भरण्यात येणार आहेत. पंतप्रधानांसाठी पदपथ मोकळे होतात, तर सर्वसामान्यांसाठी का नाही, असा सवाल करीत उच्च न्यायालयाने पालिका प्रशासन आणि राज्य सरकारला फटकारले होते. केवळ विचारमंथन करण्यात वेळ न दवडता समस्या सोडवण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याचेही न्यायालयाने बजावले होते. त्यानंतर अनधिकृत फेरीवाले, बेवारस वाहने, पदपथावरील अतिक्रमणे यावर कठोर करावी, पादचाऱ्यांसाठी पदपथ मोकळे करावेत, मुंबई फेरीवालामुक्त करावी, असे निर्देश पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले होते. अतिक्रमण निर्मूलन करताना अधिक परिणामकारकता आणि सातत्य ठेवावे लागणार आहे. केवळ दिवसाच नव्हे, तर रात्रीच्या वेळी तसेच शनिवार व रविवारदेखील नियमितपणे कारवाई केली पाहिजे. गर्दी, वर्दळीची ठिकाणे निश्चित करून सातत्याने कारवाई झाली पाहिजे, असे निर्देश आयुक्तांनी दिले होते.

### बदलापूरची शाळा RSS च्या विचारांची असल्याने...

ते पुढे म्हणाले की, पोलीस कारवाई करत नाही, आरोपी पकडत नाही म्हणून जनआंदोलन निर्माण झाले. हा राजकारणाचा विषय नाही. सरकार या विषयाचे राजकारण करत आहे. २४ तारखेला महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. महाराष्ट्राला काळीमा फासणाऱ्या सरकारला वठणीवर आणण्यासाठी बंद पुकारण्यात आला आहे. राज्यात २०१४ ते २०२४ या दहा वर्षात सुमारे २२ हजार अत्याचाराच्या घटना घडल्याचे देखील नाना पटोले यांनी म्हटले आहे, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेवरून नाना पटोले यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. ते म्हणाले की, लाडकी बहीण योजनेच्या प्रचारासाठी चारशे कोटीहून अधिक निधीची उधळपट्टी करण्यात आली आहे. लोकांनी सांगितलं तुमचे दीड हजार नको आमच्या मुली सुरक्षित हव्या आहेत. महाराष्ट्रातील सरकार असंविधानिक आहे. सरकारमधले तिघे तिजोरी पोकरत आहेत. साक्रीमधल्या कार्यक्रमासाठी आदिवासी बांधवाच घर पाडण्यात आले, अशी टीका नाना पटोले यांनी यावेळी केली आहे. दरम्यान, महाविकास आघाडीकडून येत्या २४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली आहे. बदलापूरात अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेविरोधात महाविकास आघाडीकडून बंदची घोषणा करण्यात आल्याची माहिती नाना पटोले यांनी दिली आहे. बदलापूरमध्ये झालेल्या अत्याचाराच्या घटनेने महाराष्ट्राच्या प्रतिमेला काळीमा फासला गेला आहे. या प्रकरणी महाभ्रष्ट युती सरकारविरोधात महाविकास आघाडीने २४ तारखेला महाराष्ट्र बंदची हाक देत आहे. तरी जनतेने मोठ्या संख्येने या बंदमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन नाना पटोले यांनी केले आहे

### ब्रिटनचा बिल गेट्स (माईक लिंच) व १८...

तेव्हा एका व्यक्तीचा मृत्यू झाला असता. सोमवारी ६ जणांचा मृत्यू झाला होता. बायेसियन नौका बुडाल्यानंतर जवळपास नौकेचे कोणतेही नुकसान झालेले नसताना ती बुडली कशी, असा प्रश्न निर्माण झाला. वाऱ्यामुळे किंवा मास्ट तुटल्यामुळे या नौकाचा तोल गेला आणि ती उलटली, असे अहवालात म्हटले आहे. पेरेनी नेव्ही या नौका बनवणाऱ्या कंपनीने अपघाताला मानवी चुकीचे कारण दिले आहे. कंपनीचे प्रमुख जिओव्हानी कॉस्टँटिनो म्हणाले की जहाज बुडायला १६ मिनिटे लागतील. कोस्टँटिनो यांनी इटालियन सरकारी वाहिनीशी बोलताना सांगितले की, जहाजे पाण्याने भरलेली असल्याने ती बुडत आहे, पण पाणी कुठून येते?

इटालियन हवामानशास्त्रज्ञ लुका मर्काली यांनी सांगितले की, जागतिक तापमानवाढीमुळे ही नौका बुडाली असावी. शास्त्रज्ञाने नवीन एजन्सी रॉयटर्सला सांगितले की तीव्र तापमान अनेक आठवडे चालू राहील. आता जोरदार वादळ आणि पाऊस आहे. हे ग्लोबल वॉर्मिंगमुळे होते. अपघातावेळी, सिसिलीच्या आसपास समुद्राचे उच्च तापमान सुमारे ३० अंश सेल्सिअस होते, जे सामान्यपेक्षा सुमारे ३ अंश जास्त आहे. मोठ्या वादळाच्या आगमनाचे कारणही हेच आहे.

नौका अपघातात मरण पावलेले ब्रिटिश उद्योगपती माइक लिंच (वय ५९) यांना ब्रिटनचे बिल गेट्स असे संबोधले जात होते. त्यांनी १९९६ मध्ये ऑटोनॉमी कॉर्पोरेशन नावाची सॉफ्टवेअर कंपनी स्थापन केली. या कंपन्या डेटा ॲनालिसिस करायचे. त्याच्या कंपनीने खूप प्रगती केली. लिंच हे व्यावसायिक जगतात प्रसिद्ध झाले. ऑटोनॉमीचे यश पाहून, एचपी कंपनीने २०११ मध्ये ११.७ अब्ज डॉलर्सचे संगणक खरेदी केले असतील. त्यावेळी युरोपमधला हा सर्वात मोठा तांत्रिक करार होता. मात्र एचपीने फसवणुकीचा आरोप केला. HP चा प्रश्न होता की Lynch ने कंपनी oversold केली. एचपीने लिंचचे अमेरिकेकडे प्रत्यार्पण करण्याचे आवाहन केले. हे प्रकरण १२ वर्षे चालले. त्यांना १३ महिने सॅन फ्रान्सिस्को तुरुंगात ठेवण्यात आले होते. आपली कंपनी एचपीला आवडली असती आणि सर्व माहिती जाणून घेतल्यानंतरच खरेदी केली असती, असा युक्तिवाद लिंच यांनी केला. यासाठी त्यांनी कोणताही कट किंवा फसवणूक केली नव्हती.

### शरद पवारांना केंद्राची Z+ सुरक्षा

त्यामुळं राज्यातील घडामोडी पाहता केंद्र सरकारनं त्यांना झेड प्लस सुरक्षा देण्याचा निर्णय घेतल्याची चर्चा केली. सुरक्षेचा निर्णय केंद्र सरकारच्या समितीनं घेतला आहे. यात मला सध्या कोणतेही राजकारण दिसत नाही. शरद पवारांचा राजकीय दबदबा दिवसेंदिवस वाढत आहे. या सर्व बाबींचा विचार करून केंद्र सरकारनं निर्णय घेतला असावा.

### दहीहंडीला दोन बियर फ्री, वादग्रस्त जाहिरातीनंतर...

आता, दहीहंडी उत्सव जवळ येत असून गोविंदा पथकांकडून या उत्सवाची जोरदार तयारी सुरू आहे. मात्र, याच दहीहंडी उत्सावासाठी एका रिसॉर्टने प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीवरुन हिंदू संघटना चांगल्याच आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं. गोव्यातील पेडणे मोरजी येथील प्रसिद्ध फोक्सोसोला बीच रिसॉर्टने जन्माष्टमीच्या निमित्ताने आयोजित दहीहंडी कार्यक्रमात बियर फ्री देण्याच जाहिरात केली. या प्रकरणाची हिंदू जनजागृती समितीने दखल घेत धार्मिक भावना दुखावल्या प्रकरणी मांद्रे पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. तक्रार नोंदवल्यावर 'रिसॉर्ट'च्या व्यवस्थापनाने संबंधित वादग्रस्त पोस्ट हटवली आहे. तसेच नियोजित कार्यक्रम देखील रद्द केला आहे. मात्र, या जाहिरातीची चांगलीच चर्चा सिंधुदुर्ग जिल्ह्यात होत होती. मांद्रेतील फोक्सोसोला बीच रिसॉर्टमध्ये जन्माष्टमीच्या निमित्ताने आयोजित दही हंडीकार्यक्रमाच्या जाहिरातची पोस्ट करण्यात आली होती. या पोस्टमध्ये भगवान श्रीकृष्णाचे छायाचित्र आणि त्यामध्ये 'कार्यक्रमाला येणाऱ्यांचे बियर देऊन स्वागत करणार आहे', असे लिहिण्यात आले होते. या विषयी माहिती मिळाल्यानंतर हिंदू जनजागृती समिती आणि हिंदुत्वनिष्ठ यांच्या शिष्टमंडळाने मांद्रे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरीफ जाकीस यांची भेट घेऊन रिसॉर्टचे विज्ञापन आणि कार्यक्रमाचे आयोजन यामुळे हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावल्याची तक्रार दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक शरीफ जाकीस यांनी रिसॉर्टच्या संचालकांना पोलीस ठाण्यात बोलावून घेतले. यावेळी रिसॉर्टच्या संचालकांनी सर्वांची क्षमा मागितली आणि कार्यक्रम देखील रद्द केला.

### कोल्हापूर हादरलं! बिहारी जोडप्याच्या अल्पवयीन...

श्वान पथकानं मुलीच्या घरापासून काही अंतरावर असलेल्या शेतवडीत माग काढला. या ठिकाणी पोलिसांना मुलीचा मृतदेह आढळून आला. लैंगिक अत्याचार करून या मुलीचा खून करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज जिल्हा पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी यावेळी व्यक्त केला आहे. दरम्यान, कोल्हापूर पोलिसांनी दोघा संशयितांना ताब्यात घेतलय. विशेष म्हणजे महायुतीचा आज लाडकी बहीण वचनपूर्ती सोहळा कोल्हापूरमध्ये सुरू असतानाच हा धक्कादायक प्रकार उघडकीस आलाय. त्यामुळं राज्यातील मुली आता सुरक्षित आहेत की नाहीत? हा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित झालाय. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये अल्पवयीन मुलगी एका अज्ञात व्यक्तीसोबत शेतात जात असल्याचं चित्र अगदी धूसर दिसत आहे. या व्हिडिओवरुन आरोपीचा शोध घेण्याचं काम स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा आणि शिरोली एमआयडीसी पोलीस करत आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी घटनास्थळी भेट दिल्यानंतर अल्पवयीन मुलीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आलाय. मात्र, बदलापूर नंतर कोल्हापुरात अशा पद्धतीनं घडलेल्या घटनेनं जिल्ह्यात पुन्हा संतापाची लाट उसळली आहे.

### निती आयोगाकडून एमएमआर विकास अहवाल...

यावेळी निती आयोगाचे श्री. संख्ये यांनी मुंबई महानगर आणि परिसर जागतिक आर्थिक केंद्र बनविण्यासाठी करण्यात आलेल्या अभ्यासाबाबत सादरीकरण केले. निती आयोग १३ राज्यांसाठी व्हीजन तयार करीत असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुब्रमण्यम यांनी सांगितले. राज्याच्या विकासासोबतच शहरांच्या आर्थिक विकासावर विशेष लक्ष देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबई महानगर परिसर, सुरत, वाराणसी, विशाखापट्टणम या चार महानगरांवर पथदर्शी प्रकल्प म्हणून निती आयोग काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

संपूर्ण महाराष्ट्राच्या एक तृतीयांश जीडीपी या पाच जिल्ह्यातून येत असल्याचे सांगत मुंबईत ग्लोबल सर्विसेस हब करणे, परवडणाऱ्या घरांना चालना देणे, एमएमआर परिसराला जागतिक पर्यटन केंद्र बनविणे, एमएमआरमधील बंदरांचा एकात्मिक विकास करून उद्योग आणि लॉजिस्टीक हब करणे, सुनियोजित शहरांचा विकास, सर्वसमावेशकता आणि शाश्वतता तसेच जागतिक दर्जाच्या नागरी पायाभूत सुविधा अशा सात बाबींच्या आधारे एमएमआर परिसराचा विकास डोळ्यासमोर ठेऊन आर्थिक वृद्धीचा वेग वाढविण्यात येणार आहे.मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले की, मुंबईसह महानगर परिसरात असलेल्या संधीचा लाभ घेऊन एकात्मिक विकासासाठी नियोजन निती आयोगाने केले आहे. त्यासाठी परवडणाऱ्या घरांची उभारणी करणे, रोजगार निर्मितीवर भर देणे, नवी मुंबईत डेटा सेंटरला प्राधान्य देणे त्याचबरोबर अलिबाग मल्टीमोडल कॉरिडोअरच्या उभारणीला वेग देण्यात येत आहे. नुकतेच महाराष्ट्रात सुमारे ८० हजार कोटींच्या गुंतवणुक प्रकल्पांना मान्यता दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. महाराष्ट्राला लाभलेल्या ७२० किमी लांबीच्या समुद्र किनाऱ्याचा पर्यटन विकासाच्या दृष्टीने उपयोग करून घेण्यासाठी देखील प्रयत्न केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

# महिलांचे संरक्षण करण्यात अपयशी ठरलेल्या मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा: संध्या सव्वालाखे

**मुंबई** - राज्याला एक मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्री असूनही ते महिलांना न्याय देऊ शकत नाहीत. राज्यात महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे, यातून लहान मुलीही सुटलेल्या नाहीत. गुन्हेगारांवरच अंकुश राहिला नसल्याने राज्यातील परिस्थीती बिकट बनली आहे. महिलांचे संरक्षण करण्यात अपयशी ठरलेल्या मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे यांनी केली आहे.



टिळक भवनमध्ये प्रसार माध्यमांशी बोलताना संध्या सव्वालाखे यांनी महायुती सरकारवर तोफ डागली. त्या पुढे म्हणाल्या की, बदलापूरमध्ये तीन, साडेतीन वर्षांच्या दोन मुलींवर अत्याचाराच्या घटनेने माणुसकीला काळीमा फासला आहे. गुन्हा नोंदवण्यासाठी पीडित मुलीच्या आईला पोलीस स्टेशनमध्ये १२ तास बसवून ठेवले, पोलिस दबावाखाली होते असे स्पष्ट दिसते. ज्या शाळेत हा गुन्हा घडला त्या शाळेतील संबंधित लोकांवर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करावा. घटना १२ तारखेला घडली व १५ तारखेला मुख्यमंत्री एका कार्यक्रमासाठी बदलापुरात होते पण त्यांच्यापर्यंत ही माहिती का पोहचली नाही. राज्यातील महिला अत्याचाराच्या एका घटनेत तपास करून दोन महिन्यात आरोपीला फाशी दिली, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी काल एका कार्यक्रमात सांगितले. ही घटना कोणती व कोणाला फाशी दिली त्याचा खुलासा करावा व बदलापूरच्या नराधमालाही तातडीने फाशी द्यावी, असेही सव्वालाखे म्हणाल्या.

महिला काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी बदलापूरमध्ये झालेल्या लहान मुलींवरील अत्याचाराची माहिती घेतली व पोलीस स्टेशनला भेटून तात्काळ कारवाई करण्याची मागणी केल्याची माहिती सव्वासाखे यांनी दिली. बदलापूरच्या घटनेने देश हादरला पण राज्य महिला आयोगाने तीन-चार दिवस या घटनेची दखलही घेतली नाही, त्या कुठे होत्या. हे काम बाल हक्क आयोगाचे आहे माझे नाही, असे उद्धट उत्तर त्यांनी दिले, अशा बेजबाबदार व निष्क्रीय व्यक्तीने पदाचा राजीनामा द्यावा. भाजपाच्या चित्रा वाघ यांनीही बदलापूरच्या लहान मुलीबद्दल एक शब्दही काढला नाही उलट कोलकात्याच्या घटनेवर त्या बोलत आहेत. बदलापूरच्या माजी नगराध्यक्षाने एका महिला पत्रकाराला अश्लील भाषा वापरली, या महिला पत्रकाराचा दोन दिवस गुन्हा नोंद करुन घेतला नाही, या माजी नगराध्यक्षला अटक करा अशी मागणीही सव्वालाखे यांनी केली.

बदलापूरसारख्याच घटना अकोला, नाशिक, ठाणे जिल्ह्यात घडल्या आहेत. राज्यातील महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना व निष्क्रीय सरकार लक्षात घेऊन प्रदेश महिला काँग्रेस प्रत्येक जिल्ह्यात नारी न्याय समिती स्थापन करणार आहे. या समितीत एक महिला वकील व पाच महिला सदस्य असतील, पीडित महिलांना सर्व प्रकारची मदत तसेच समुपदेशन करण्याचे काम ही समिती करेल, अशी माहिती संध्या सव्वालाखे यांनी दिली आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## होतकरुंना जर्मनीत रोजगाराची संधी शासन करणार जर्मन भाषा शिकण्याचा खर्च

**ठाणे :-** जर्मनीतील बाडेन-वुटेनबर्ग या राज्यासोबत महाराष्ट्र सरकारने कुशल मनुष्यबळ पुरविण्यासंदर्भातील सामंजस्य करार केला आहे. याच करारानुसार ठाणे जिल्ह्यातील होतकरूना जर्मनीत रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. एका व्यक्तीवरील प्रशिक्षणाचा खर्च सुमारे ३३ हजार रुपये राहणार असला तरी तो खर्च शासन करणार असल्याची माहिती जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ.संजय वाघ यांनी दिली आहे. बाडेन-वुटेनबर्ग या राज्याने किमान १० हजार कुशल मनुष्यबळाची मागणी नोंदविली आहे. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने राज्यातील प्रशिक्षण बेरोजगारांना विदेशात रोजगार उपलब्ध व्हावा, या हा हेतूने करार करण्यात आला आहे. जर्मनीत रोजगारासाठी जाऊ इच्छिणाऱ्यांना जर्मन भाषा व तेथील राजशिष्टाचाराची माहिती देण्यासाठी सुरुवातीला प्रशिक्षण दिले जाईल. शिवाय जर्मन भाषा जर्मनी येथील गोथे या संस्थेच्या सहकार्याने शिकविली जाणार आहे. परीक्षा उत्तीर्ण केलेल्यांना जर्मनीत चांगले वेतन असणारा रोजगार उपलब्ध होणार आहे. हा उपक्रम प्रायोगिक तत्वावर राबविला जात असून संबंधित करार २५ फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आला आहे. आरोग्य क्षेत्राचा विचार केल्यास प्रशिक्षण पूर्ण केलेल्या परिचारिका, सहाय्यक रेडिओलॉजिस्ट, सहाय्यक दंत चिकित्सक, वैद्यकीय लेखा अधिकारी, कौशल्य विकास क्षेत्रातील स्वागत कक्ष संचालक, स्वयंपाकी, हॉटेल व्यवस्थापक तर तंत्र शिक्षण क्षेत्रातील प्रशिक्षित वीजतंत्री, अक्षय ऊर्जा वीजतंत्री, औष्णिक वीजतंत्री, गवंडी काम करणारे, नळ जोडणी, वाहन चालक, सुरक्षा रक्षक अशा एकूण ३० विविध क्षेत्रांचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्यांसाठी ही सूवर्णसंधीच राहणार आहे. जर्मन भाषेचे प्रशिक्षण व राजशिष्टाचाराबाबतच्या प्रशिक्षणानंतर परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर प्रमाणपत्र प्राप्त व्यक्तींना जर्मनीत रोजगार मिळणार आहे. विविध क्षेत्राचे प्रशिक्षण घेतलेले आणि जर्मनीत रोजगारानिमित्त जावू इच्छिणाऱ्यांची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. जर्मन भाषा शिकण्यासाठी https://www.maa.ac.in/GemanyEmployment/ संकेतस्थळावर नोंदणी करावी.

# अक्षय निर्दोष आहे बदलापूर प्रकरणातील आरोपीच्या आई-वडिलांचा दावा

**बदलापूर :** बदलापूर या ठिकाणी असलेल्या नामांकित शाळेत दोन चिमुरड्या मुलींचं लैंगिक शोषण केल्या प्रकरणी आरोपी अक्षय शिंदेला अटक करण्यात आली आहे. या प्रकरणातल्या आरोपीला फाशी झाली पाहिजे ही मागणी करत मुलींच्या पालकांसह बदलापूरकरांनी आंदोलन केलं. बदलापूरच्या रेल्वे स्थानकावरही मोठा जनक्षोभ पाहण्यास मिळाला. या घटनेला चोवीस तास उलटताच आता अक्षय शिंदे निर्दोष असल्याचा दावा त्याच्या आई वडिलांनी केला आहे.



बदलापूर येथील नामांकित शाळेत जाणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार करण्यात आला. शाळेतला सफाई कर्मचारी अक्षय शिंदे याने हे अत्यंत घृणास्पद कृत्य केलं. दरम्यान या घटनेचा उद्रेक बदलापूरमध्ये २० ऑगस्टच्या दिवशी पाहण्यास मिळाला. बदलापूरमध्ये रेल रोको आंदोलन करत आंदोलकांनी सुमारे ९ तास लोकल सेवा ठप्प केली होती. दरम्यान अक्षय शिंदेच्या आई वडिलांनी वेगळाच दावा केला आहे. बदलापूर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचे आई-वडील आणि लहान भावाशी मोबाईल फोनवरुन संपर्क साधण्यात आला. एबीपी माझाला दिलेल्या प्रतिक्रियेत अक्षय शिंदेच्या आई वडिलांनी असा दावा केला आहे की अक्षय शिंदे याने मुलींसोबत जे काही केले, तसा कोणताही प्रकार घडला नाही. अक्षयला फसवण्यात येत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

अक्षयचे आई-वडील म्हणाले, "अक्षयला फक्त १५ दिवस झाले होते कामाला लागून. १७ तारखेला त्याला पोलिसांनी धरलं. अक्षयला धरुन नेलं इतकंच आम्हाला सांगण्यात आलं. पोलिसांनी अक्षयला मारहाण केली. माझ्या लहान मुलालाही पोलिसांनी मारलं. चौकीत गेल्यावर पोलिसांनी सांगितलं की तुमच्या मुलाने चुकीचा प्रकार केला आहे. अक्षय फक्त ११ वाजता बाथरुम धुवायला जात होता. बाकी कुठलंही काम दिलेलं नव्हतं. त्यानंतर शाळेत झाडू मारायचा. संध्याकाळी साडेपाच वाजता शाळा सुटली की झाडू मारायला जायचो. आमचं सगळं कुटुंबच तिथे कामाला होतं. माझ्या मुलाने हा काही प्रकार केलेला नाही." असं अक्षयच्या आईने सांगितलं.

"आमच्या घरात लोक शिरले, आम्हाला मारहाण करण्यात आली आणि घराबाहेर ढकलून दिलं. तुम्ही इथे राहूच नका असं आम्हाला सांगितलं. आमचं कुणी काही ऐकूनच घेतलं नाही." असं अक्षयचे वडील म्हणाले. एबीपी माझाला फोनवरुन दिलेल्या प्रतिक्रियेत अक्षय शिंदेच्या आई वडिलांना हा दावा केला आहे. त्यामुळे आता या प्रकरणाला नवं वळण लागण्याची शक्यता आहे.

## बदलापूर येथील लैंगिक अत्याचार विरोधात मुरबाड करांचा संताप!




**मुरबाड -** बदलापूर येथील आदर्श शाळेतील अल्पवयीन विद्यार्थिनीवर झालेल्या लैंगिक अत्याचारच्या निषेधार्थ मुरबाड मध्ये आज विद्यार्थी, शिक्षक, महिला, तसेच मुरबाडकर नागरिकांनी पालकांसह मुरबाड पोलीस ठाणे, तहसीलदार यांना लेखी निवेदन देऊन आपला संतप्त भावना व्यक्त केल्या. तर संध्याकाळी मुरबाड नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक रामभाऊ दूधाळे यांच्या नेतृत्व शहरात आक्रोश मोर्चा काढण्यात आला. येथील शालेय तीन वर्षाच्या अल्पवयीन विद्यार्थिनीवर त्या शाळेत काम करणारा कर्मचारी अक्षय शिंदे या नराधमाने तिचे लैंगीक शोषण करून अत्याचार केल्याने निषेधार्थ सदरच्या नरधमास तात्काळ फाशी द्यावी याकरता मुरबाड शहरातील सर्व विद्यालय व विद्यालयातील विद्यार्थी शिक्षक, पालक, व नागरिक यांनी मोठ्या संख्येने आक्रोश मोर्चात सहभागी झाले होते.या नराधमाला तात्काल फाशी द्या यांच्यासह विविध मागण्या शासनापर्यंत पोचण्यासाठी लेखी निवेदन मुरबाड पोलीस विभागीय अधिकारी जगदीश शिंदे यांना याप्रसंगी देण्यात आले.यावेळी ज्येष्ठ नेते लियाकत शेख, माजी नगरसेवक रवींद्र देसले यांच्यासह अनेक मान्यवर व मुरबाड शहरातील नागरिक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वारावर दारूच्या बाटल्यांचा खच, प्लास्टिक पिशव्या, दुर्गंधीने पादचारी हैराण

**डोंबिवली –** डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानकाबाहेरील स्कायवॉकखालील रस्ता दुभाजकावर मद्यपी रात्रीच्या वेळेत दारू पिण्यास बसतात. दारूच्या बाटल्या, चाखण्यासाठी आणलेले खाद्यपदार्थ तेथेच टाकून निघून जातात. प्लास्टिकच्या पिशव्यांमधून हे साहित्य आणले जाते. त्यामुळे रस्ता दुभाजकामध्ये दारूच्या रिकाम्या बाटल्या, प्लास्टिक पिशव्या, नासाडी झालेले खाद्य पदार्थ या भागात पडलेले असते.

डोंबिवली पश्चिमेत विष्णुनगर भागातून बाहेर पडले की मासळी बाजाराची दुर्गंधी आणि आता पूर्व भागातून पाटकर रस्त्याने बाहेर पडले की दारूच्या बाटल्यांचा खच प्रवाशांचे स्वागत करतो. या सगळ्या प्रकराने मागील काही दिवसांपासून प्रवासी हैराण आहेत. पाटकर रस्त्यावर संध्याकाळी सात वाजल्यापासून मद्यपी दारू पिण्यास बसतात. याठिकाणी गर्दुल्ले, मद्यपी, मागतेकरी यांचा अड्डा झाला होता. याविषयी पालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्याकडे अनेक महिलांनी तक्रारी केल्या होत्या. आयुक्त जाखड यांच्या आदेशावरून फ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त भारत पवार, ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त



संजयकुमार कुमावत, रामनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जवादवाड यांनी एकत्रितपणे मोहीम राबवून पाटकर रस्त्यावरील मद्यपींवर कारवाई केली होती. या भागातील दारू विक्री दुकान बंद करून त्याचा परवाना रद्द करण्याची शिफारस उत्पादन शुल्क विभागाला पालिकेकडून करण्यात आली होती. या भागातील दारूच्या दुकानामुळे मद्यपी या भागात खरेदीसाठी येतात.

ते दारू खरेदी करून रस्त्यावरील दुभाजकामध्ये बसून उघड्यावर दारू पितात. रेल्वे स्थानकातून बाहेर पडणारे प्रवासी हा सगळा प्रकार बघतात. रात्रभर हा प्रकार सुरू असतो. पालिका, पोलिसांनी कारवाई केल्यापासून हा प्रकार थांबला होता. आता रात्रीच्या वेळेत हा प्रकार पुन्हा सुरू झाला आहे, अशा तक्रारी प्रवाशांकडून केल्या जात आहेत. रात्रीच्या वेळेत पाटकर रस्ता भागातून महिला, पुरुष जात असेल तर हे मद्यपी त्यांची छेडछाड करतात. त्यांच्या जवळील किमती ऐवज, मोबाईल हिसकावून घेण्याचा प्रयत्न करतात, अशा तक्रारी आहेत. पाटकर रस्त्यावर पुन्हा मद्यपी बसण्यास सुरुवात झाली असेल तर रामनगर पोलिसांच्या साहाय्याने या भागातील मद्यपी हटविण्याची मोहीम पुन्हा हाती घेण्यात येईल. रस्ता दुभाजकामधील कचरा काढून टाकण्याच्या सूचना घनकचरा विभागाला केल्या जातील. रस्ता दुभाजकामध्ये कचरा टाकणारा निदर्शनास आला तर त्याच्यावर कारवाई केली जाणार आहे.

## तळोजा उड्डाणपुलावर भगदाड

**पनवेल :** तळोजा औद्योगिक वसाहतीमधून मुंब्रा पनवेल महामार्गाला जोडणाऱ्या नावडेफाटा येथील उड्डाणपुलावर मोठे भगदाड पडल्याने अपघातास आमंत्रण असे चित्र पुलावर आहे. वाहतूक पोलिसांनी बुधवारी या भगदाडात कोणतेही वाहन अडकू नये यासाठी भगदाडापासूनच्या परिसराला बॅरीगेट्स लावून परिसर सुरक्षित केला. मात्र पुलावर पडलेल्या आरपार भगदाडामुळे पुलाच्या बांधकामाबाबत उद्योजकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.





महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) २००४ साली संबंधित उड्डाणपूल लाखो रुपये खर्च करुन बांधला होता. बीयुबी कंपनीने हा उड्डाणपूल बांधला होता. सुरुवातीचे पाच वर्षे बीयुबी कंपनीकडे या पुलाची डागडुजी करण्याची अट होती. परंतु, २० वर्षांनी पुन्हा एकदा या पुलाच्या कामाविषयी साशंकता निर्माण केली जात आहे. या उड्डाणपुलामुळे तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये येजा करणाऱ्या वाहनचालकांची दिवा पनवेल रेल्वे मार्गावरील फाटकात तासंतास प्रतिक्षा करण्याची समस्या संपली होती. सतत या पुलावर होणारी अवजड वाहनांच्या वर्दळीमुळे या पुलावर खड्डे पडले आहेत. हा पूल बांधल्यापासून या पुलावर सतत पडणाऱ्या खड्ड्यांमुळे हा पूल नेहमी चर्चेत राहिला आहे.

## अंबरनाथमध्ये ३५ वर्षांच्या व्यक्तीकडून अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**ठाणे –** गेल्या महिनाभराच्या कालावधीत अल्पवयीन मुलगी घरासमोरील सार्वजनिक शौचालयात नैसर्गिक विधीसाठी आली की तिच्याशी जवळीक साधून, तिच्याशी गैरकृत्य करून तिचा विनयभंग करणाऱ्या एका ३५ वर्षाच्या नराधमाविरुद्ध पीडित मुलीच्या आईच्या तक्रारीवरून अंबरनाथ पोलिसांनी बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याने बुधवारी गुन्हा दाखल केला आहे. बदलापूर शाळेच्या घटनेवरून धडा घेतलेल्या पोलिसांनी पीडित मुलीची आई पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी येताच पोलिसांनी तात्काळ नराधामाविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. संतोष आनंद कांबळे (३५) असे आरोपीचे नाव आहे. तो नोकरी करतो. तो अंबरनाथ पश्चिमेतील शिवसेना शाखेजवळील



भास्कर नगर भागात राहतो. जुलै ते ऑगस्ट या महिनाभराच्या कालावधीत आरोपी संतोष कांबळे पीडित मुलीबरोबर अश्लील चाळे करून तिचा विनयभंग करत होता. हा सगळा प्रकार उघडकीला आल्यानंतर पीडित मुलीच्या आईने तक्रार केली आहे. पोलिसांनी सांगितले, आरोपी संतोष कांबळे हा अंबरनाथ पश्चिमेतील भास्कर कॉलनीत राहतो. या वसाहतीसाठी संतोष कांबळे यांच्या घराच्या परिसरात अंबरनाथ पालिकेचे सार्वजनिक स्वच्छतागृह आहे. नैसर्गिक विधीसाठी नागरिक या शौचालयाचा वापर करतात. पीडित मुलगी सार्वजनिक स्वच्छता गृहात नैसर्गिक विधीसाठी आली की आरोपी संतोष तेथे यायचा. तेथे कोणी नाही पाहून तिच्याशी जवळीक साधून तिला स्वताच्या मोबाईलमधील अश्लील दृश्यचित्रफिती दाखवायचा.

## "गुन्हेगाराला वर्षा बंगल्याच्या मागे फाशी दिली का?" शिंदेंच्या 'त्या' वक्तव्यावरून संजय राऊतांचा चिमटा

**बदलापूर -** बदलापूरमध्ये दोन चिमुकल्या मुलींवरील झालेल्या अत्याचाराच्या घटनेचे राज्यभर पडसाद उमटू लागले आहेत. मुलींवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला फाशीची शिक्षा द्यावी, तसेच याप्रकरणी कारवाई करण्यास दिरंगाई करणाऱ्या पोलिसांवर व शाळेवर कारवाई करण्याची मागणी बदलापूरकरांनी केली आहे. दरम्यान, या प्रकरणार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. एकनाथ



शिंदे यांनी दावा केला आहे की "चार महिन्यांपूर्वी राज्यात अशीच एक बलात्काराची घटना घडली. मात्र आम्ही त्याप्रकरणी फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालवून दोन महिन्यात गुन्हेगाराला फाशीची शिक्षा दिली". मात्र शिंदे यांचा हा दावा खोटा असल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले, "विरोधक म्हणत होते की या महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना नको, सुरक्षित बहीण योजना हवी. मी या सगळ्यांना सांगू इच्छितो की तीन-चार महिन्यांपूर्वी महाराष्ट्रात माझ्या एका बहिणीबरोबर अशीच एक घटना घडली. आम्ही तो खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवला. पीडितेची बाजू मांडण्यासाठी विशेष वकील व पुरावे दिले, पोलिसांनी भक्कम खटला उभा केला, खूप मेहनत केली. त्यानंतर दोन महिन्यांनी त्या आरोपीला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली".

यावर शिवसेनेच्या ठाकरे गटातील खासदार संजय राऊत म्हणाले, "मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांन बदलापूर प्रकरणानंतर केलेल्या एका वक्तव्याची व्हिडीओ क्लिप वायरल होत आहे. त्यात ते सांगत आहेत की दोन चार महिन्यांपूर्वी महाराष्ट्रात अशीच एक घटना घडली, पण आम्ही ते प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवलं. दोन महिन्यांपूर्वी त्या आरोपीला फाशीची शिक्षा ठोठावली.

## डोंबिवली ते कसारा परिसरातील २० हजारांहून अधिक प्रवाशांचा काळ्या फिती लावून रेल्वे प्रवास



**कल्याण –** ठाणे ते कर्जत, कसाराकडील लोकल फेऱ्या वाढवा. या रेल्वे मार्गावर ठाण्यापासून शटल सेवा सुरू करा. कोपर ते मुंब्रा भागातील वाढत्या रेल्वे प्रवासी अपघातांची गंभीर दखल घेण्यात यावी. गर्दीच्या वेळेत महिलांसाठी विशेष लोकल सोडण्यात याव्यात, अशा विविध मागण्यांसाठी रेल्वे प्रवासी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी गुरुवारी रेल्वे प्रवाशांच्या सहकार्याने सफेद गणवेश घालून, काळया फिती लावून रेल्वे प्रवास केला. कसारा ते डोंबिवली परिसरातील सुमारे २० हजारांहून अधिक प्रवाशांनी काळया फिती लावून रेल्वे प्रवास केला. रेल्वे अधिकारी प्रवाशांच्या मागण्यांकडे लक्ष देत नसल्याने त्यांच्या या मागण्यांकडे एकत्रितपणे लक्ष जावे, या उद्देशातून सर्व रेल्वे प्रवाशांनी गुरुवारी सफदे गणवेश घालून, काळया फिती लावून प्रवास करण्याचे आवाहन कल्याण-कसारा रेल्वे प्रवासी संघटना, उपनगरीय रेल्वे प्रवासी महासंघाने केले होते. रेल्वे सुरक्षा जवान, लोहमार्ग पोलीस यांच्या सहकार्याने रेल्वे प्रवासी संघटनांनी हे आंदोलन राबविले. प्रवाशांनी या आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## ठाण्यात टाऊन पार्कच्या उभारणीसाठी हालचाली, पार्कसाठी पालिकेने तयार केला आरक्षण बदलण्याचा प्रस्ताव

**ठाणे :** येथील कोलशेत भागातील सुमारे २० एकर जागेवर 'नमो द ग्रँड सेंट्रल पार्क'ची उभारणी करण्यात आली असतानाच, त्यापाठोपाठ आता याच भागात टाऊन पार्कची उभारणी करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. या पार्कमध्ये मत्स्यालय, तारंगण, विज्ञान केंद्र आणि सेंद्रीय वनस्पती प्रकल्प यांचा समावेश असणार आहे. टाऊन पार्कच्या उभारणीसाठी पालिका प्रशासनाने कोलशेत भागातील जागेचा आरक्षण बदलण्याचा प्रस्ताव तयार केला असून यानुसार अग्निशमन केंद्राचे आरक्षण रद्द करून ही जागा टॉवर पार्कसाठी आरक्षित करण्यात येणार आहे. यासाठी पालिका प्रशासनाने हरकती आणि सूचना मागविल्या आहेत. ठाणे येथील कोलशेत भागातील पार्कसिटी गृहप्रकल्पाच्या परिसरातील सुमारे २०.५ एकर जागेवर 'नमो द ग्रँड सेंट्रल पार्क'ची उभारणी करण्यात आली आहे. ठाणे महापालिकेने बांधीव हस्तांतरण विकास हक्क (कन्स्ट्रक्शन टीडीआर) च्या माध्यमातून कल्पतरु विकासकाकडून हे उद्यान विकसित करून घेतले आहे. या उद्यानास नागरिकांची पसंती मिळत असल्यामुळे पालिकेने याच



भागात मनोरंजन (ॲम्युजमेंट पार्क) आणि हिमोद्यान (स्नो पार्क) प्रकल्प उभारण्यासाठी पालिकेने पाऊले उचलली आहे. त्यापाठोपाठ आता कोलशेत येथील वरचा गाव परिसरातील ७.५४ हेक्टर जागेवर टाऊन पार्कची उभारणी करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला असून या पार्कच्या माध्यमातून मत्स्यालय, तारंगण, विज्ञान केंद्र आणि सेंद्रीय वनस्पती प्रकल्पाची उभारणी करण्यात येणार आहे. मुंबईच्या धर्तीवर ठाणे शहरात अंतरराष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय उभारणीची संकल्पना २००३ मध्ये पुढे आली होती. २०१३ मध्ये तत्कालीन आयुक्त आर.ए. राजीव यांनी ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. बांधा वापरा आणि हस्तांतरित करा या तत्वावर मत्स्यालय उभारणीचा प्रस्ताव प्रशासनाने तयार केला होता.

### जागेच्या आरक्षणात बदल

कोलशेत येथील पार्कसाठी आरक्षित असलेल्या जागेवर टाऊन पार्क अंतर्गत विकसित केले जाणार आहे. या जागेवर सद्यस्थितीत अग्निशमन केंद्रचे आरक्षण आहे. याठिकाणी टाऊन पार्कची उभारणी करायची असेल तर त्याचे आरक्षण बदलावे लागणार आहे. यामुळे पालिका प्रशासनाने आता जागेवरील अग्निशमन केंद्र हे आरक्षण रद्द करून ती जागा टाऊन पार्कसाठी आरक्षित करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. पालिका प्रशासनाने या आरक्षण फेरबदलासंदर्भात हरकती, सूचना मागविल्या असून त्यासाठी पालिकेने ३० दिवसांची मुदत दिली आहे. नागरिकांकडून हरकती आणि सूचना प्राप्त होताच त्यावर सुनावणी घेऊन त्या निकाली काढल्या जाणार आहेत. त्यानंतर हा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे पाठविला जाणार आहे, अशी माहिती पालिका सुत्रांनी दिली.

## वाढवण बंदर देशातील सर्वोत्तम बंदर बनणार

**उरण :** डहाणू येथील वाढवण बंदर हे देशातील सर्वोत्तम बंदर म्हणून गणले जाणार असल्याचे मत केंद्रीय बंदरे, जहाज वाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाचे मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी व्यक्त केले आहे. गुरुवारी त्यांच्या उपस्थितीत जेएनपीए बंदराच्या प्रशासन भवनात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी राज्याचे बंदर विभागाचे सचिव संजय सेठी व जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेष वाघ हेही उपस्थित होते. यावेळी ते बोलत होते. वाढवण बंदर केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्याने उभारण्यात येणार आहे. या बंदराच्या परिसरात तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी जेएनपीए कडून व्यवसाय प्रशिक्षण सुरू करण्यात येणार आहेत त्याचे तसेच जेएनपीए बंदर परिसरात सुशोभीकरण करण्यात आलेल्या सरोवरांचे सोनेवाल यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. यामध्ये या सरोवरांचे महाराष्ट्रातील संत ज्ञानेश्वर,तुकाराम व एकनाथ महाराज यांची नावे देण्यात आली आहेत. यावेळी त्यांनी बंदरातील पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पाचा आढावा घेतला. तर बंदरावर आधारित सेझ प्रकल्पातील शिस्तबद्ध वाहने हाताळणी,वाहनांची सुकर व गतीने येजा ऊर्जा व्यवस्थापण, व्यवहार आदी सुविधांच्या स्मार्ट सेझ प्रणालीचेही भूमीपूजन करण्यात आले. त्याचप्रमाणे सेझ मधील भूखंड धारकांचे सामंजस्य करार ही करण्यात आले. तर नव्याने उभारण्यात येणाऱ्या पालघर जिल्ह्यातील डहाणू येथील वाढवण बंदर परिसरातीलस्थानिक तरुणांना विविध प्रकारच्या रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार आहे.

# महिला ट्वेन्टी-२० विश्वचषक बांगलादेशऐवजी यूएईत

**दुबई :** बांगलादेशातील अराजकतेच्या पार्श्वभूमीवर, आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) महिलांची ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धा संयुक्त अरब अमिराती (यूएई) येथे खेळवण्याचा निर्णय घेतला आहे.ही स्पर्धा ३ ते २० ऑक्टोबर या कालावधीत रंगणार असून सामने दुबई आणि शारजा येथे खेळवले जातील. ‘‘महिलांची ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धा बांगलादेशऐवजी अन्यत्र खेळवावी लागणे हे अत्यंत दुर्दैवी आहे.


मात्र, आता अमिराती येथे ही स्पर्धा यशस्वीपणे पार पडेल याची मला खात्री आहे,’’ असे ‘आयसीसी’चे मुख्य कार्यकारी अधिकारी जेफ अॅलर्डाइस म्हणाले.



माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या विरोधातील नागरिकांच्या तीव्र उद्रेकामुळे बांगलादेशातील परिस्थिती बिकट झाली आहे. त्यामुळे तेथील सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. ऑस्ट्रेलियाची कर्णधार एलिसा हिलीनेही याबाबत चिंता व्यक्त केली. त्यामुळे ‘आयसीसी’ला स्पर्धा अन्यत्र हलविणे भाग पडले. या विश्वचषक स्पर्धेच्या आयोजनाबाबत ‘आयसीसी’ने भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला (बीसीसीआय) विचारणा केली होती. मात्र, त्यांचा प्रस्ताव ‘बीसीसीआय’चे सचिव जय शहा यांनी फेटाळून लावला होता. त्यानंतर श्रीलंका आणि झिम्बाब्वे यांनी या स्पर्धेचे यजमानपद भूषवण्याची तयारी दर्शवली होती.

# “माझ्या आईसाठी त्याने…”, प्रसिद्ध दिग्दर्शकाला अक्षय कुमारने केलेली मदत

खिलाडी कुमार म्हणून ओळखला जाणारा अभिनेता म्हणजे अक्षय कुमार होय. हा अभिनेता आपल्या चित्रपटांच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत असतो. आता मात्र एका निर्माता व कास्टिंग दिग्दर्शक मुकेश छाब्राने एका मुलाखतीदरम्यान अक्षय कुमारबाबत वक्तव्य केल्याने



अभिनेता सध्या चर्चेत आला आहे. रणवीर अलाहबादियाच्या यूट्यूब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत, अक्षय कुमारविषयी बोलताना मुकेश छाब्राने म्हटले, “दोन वर्षांपूर्वी माझ्या आईला हृदयविकार झाला होता. मला त्यावेळी चित्रपट निर्माते आनंद एल. राय यांनी मला सांगितले की, ज्या डॉक्टरांकडून तुला तुझ्या आईवर उपचार करायची गरज आहे, ते अक्षय कुमारच्या जवळचे आहेत. मी अक्षय कुमारला मेसेज केला आणि लगेच अक्षय कुमारचा मला फोन आला. त्याने दवाखान्यात सगळी व्यवस्था केली. तो १५ दिवस सलग मला न चुकता फोन करायचा. तुझी आई कशी आहे? तू कसा आहेस? हे मला विचारत असे. डॉक्टरबरोबरदेखील तो सतत बोलत असायचा. तो त्याच्या कामात खूप व्यग्र असायचा; पण तरीही तो हे करीत होता.

माझ्या आईच्या प्रकृतीबद्दल काळजीने विचारपूस करीत होता. मी हे सगळे कधीच विसरू शकत नाही. नंतर त्याने माझ्या आईची भेटदेखील घेतली होती. आम्ही एकमेकांच्या इतके जवळ नव्हतो, तरीही तो माझ्या मदतीसाठी धावून आला. एखादा माणूस तुमच्या मदतीसाठी अशी पावले उचलतो तेव्हा तुम्ही त्याच्या अत्यंत जवळचे असले पाहिजे. मात्र, आमच्या बाबतीत तसे नव्हते. त्या घटनेनंतर आम्ही एकमेकांशी बोलायला लागलो; पण मी तो क्षण कधी विसरू शकत नाही. अक्षय कुमार त्याने केलेल्या मदतीबद्दल कधीही बोलत अशी आठवण दिग्दर्शकाने सांगितली आहे.

मुकेश छाब्रा यांच्या आईचे २०२३ मध्ये निधन झाले. दिग्दर्शकाच्या कामाबद्दल बोलायचे, तर ते रणबीर कपूरची मुख्य भूमिका असलेल्या ‘रामायण’ या आगामी चित्रपटात त्यांनी कास्टिंग डायरेक्टर म्हणून काम केले आहे.

# तुम्हीही दररोज प्रोटीन सप्लिमेंट्स घेता का?



बॉडी बनवण्याची तरुणांमध्ये प्रचंड क्रेझ आहे. त्यासाठी ते जिममध्ये तासनतास वर्कआउट करतात. क्रीडापटूंपासून ते व्यायामशाळेच्या उत्साही लोकांपर्यंत सगळेच हल्ली प्रोटीन सप्लिमेंट्स पावडर आणि प्रोटीन शेक घेत असतात. शरीर निरोगी ठेवण्यासाठी जर तुम्ही प्रोटीन पावडर किंवा प्रोटीनचे डब्बे, प्रोटीन सप्लिमेंट्स खात असाल तर त्याचे शरीरावर होणारे परिणाम, सकारात्मक आणि संभाव्य तोटे समजून घेणे महत्त्वाचे आहे. अथ्रेया हॉस्पिटल बेंगळुरूच्या वरिष्ठ पोषणतज्ज्ञ अक्षिता रेड्डी यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे. अथ्रेया हॉस्पिटल बेंगळुरूच्या वरिष्ठ पोषणतज्ज्ञ अक्षिता रेड्डी म्हणतात, “प्रोटीन सप्लिमेंट्सची अलीकडच्या काळात लोकप्रियता वाढली आहे. मात्र, याला पर्याय म्हणून आपण मठ्ठा, केसिन, सोया, वाटाणा किंवा तांदूळ यांसारख्या प्रथिनांचा आहारात समावेश करू शकतो. प्रोटीन सप्लिमेंट्सच्या अलीकडच्या काळातील लोकप्रियतेचे स्पष्टीकरण देताना अक्षिता रेड्डी म्हणतात की, आहारातून जे प्रथिने आपल्या शरीरात जातात त्याचा परिणाम दिसायला वेळ लागतो. तर प्रोटीन ड्रिंक, प्रोटीन सप्लिमेंट्स हा एक जलद आणि सोपा मार्ग आहे. याव्यतिरिक्त जे शाकाहारी आहेत, असे लोक पौष्टिक गरजा पूर्ण करण्यासाठी प्रोटीन सप्लिमेंट्स खातात.

## दिनविशेष

### घटना

२०१२ : राजस्थानात अतिवृष्टीमुळे ३० जण ठार.
२०११: लिबियाचा हुकूमशहा मुअम्मर गडाफीची सत्ता संपुष्टात.
२००५ : कविवर्य विंदा करंदीकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान.
१९९७: हळदीच्या पेटंटबाबतचा अमेरिकेशी चालू असलेला कायदेशीर लढा भारताने जिंकला. एखाद्या विकसनशील देशाने अमेरिकन पेटंटला आव्हान देऊन तो जिंकण्याची ही पहिलीच घटना आहे.
१९९१: वर्ल्ड वाईड वेब सार्वजनिक उपयोगासाठी सुरु झाले.
१९९०: आर्मेनिया सोव्हिएत युनियनपासून स्वतंत्र झाला.
१९६६: लुनार ऑर्बिटर-१ या मानवरहित अंतराळयानाने चंद्रावरून पहिल्यांदाच पृथ्वीची छायाचित्रे काढली.
१९४२ : दुसरे महायुद्ध - स्टालिन ग्राडची लढाई सुरू.
१९१४: पहिले महायुद्ध - जपानने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.

### जन्म

१९७४: कॉन्स्टँटिन नोव्होसेलोव्ह - रशियन- इंग्रजी भौतिकशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक - नोबेल पुरस्कार
१९७३ : मलायका अरोरा खान मॉडेल आणि अभिनेत्री
१९६८ : कृष्णकुमार कुन्नाथ (केके) - सुप्रसिद्ध भारतीय गायक (निधन: ३१ मे २०२२)
१९६४ : काँग ही - सिटी हार्वेस्ट चर्चचे संस्थापक आणि माजी वरिष्ठ पास्टर
१९५१: नूर जॉर्डनची राणी
१९५१: अखमद कादिरोव चेचन प्रजासत्ताक देशाचे १ले अध्यक्ष, चेचन धर्मगुरू आणि राजकारणी (निधन: ९ मे २००४)
१९५१ : राणी नूर जॉर्ड देशाची राणी
१९४४ : सायरा बानू - चित्रपट अभिनेत्री
१९३३ : रॉबर्ट कर्ल - अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ - नोबेल पुरस्कार (निधन: ३ जुलै २०२२)

### मृत्यू

६३४ : अबू बक्र रशीदुन खलीफाचे पहिले खलिफा (जन्म: २७ ऑक्टोबर ५७३) ४०६ : रडगाईसुस गॉथिक राजा
२०२२ : एस. व्ही. वेणुगोपन नायर भारतीय लेखक (जन्म: १८ एप्रिल १९४५)
२०१६ : रेनहार्ड सेल्टन - जर्मन अर्थशास्त्रज्ञ आणि गणितज्ञ - नोबेल पुरस्कार (जन्म: ५ ऑक्टोबर १९३०)
२०१३: रिचर्ड जे. कॉर्मन - अमेरिकन उद्योगपती, आर. जे. कॉर्मन रेलरोड ग्रुपचे संस्थापक (जन्म: २२ जुलै १९५५)
२००३ : मायकेल किजाना वामलवा केनिया देशाचे ८वे उपाध्यक्ष, वकील आणि राजकारणी (जन्म: २५ नोव्हेंबर १९४४)
१९९७ : एरिक गेयरी - ग्रेनेडा देशाचे १ले पंतप्रधान, ग्रेनेडियन शिक्षक आणि राजकारणी (जन्म: १८ फेब्रुवारी १९२२)
१९९७: जॉन केंद्रू - इंग्रजी बायोकेमिस्ट आणि क्रिस्टलोग्राफर - नोबेल पुरस्कार (जन्म: २४ मार्च १९१७)
१९९४ : आरती साहा - इंग्लिश खाडी पोहून पार करणाऱ्या पहिल्या भारतीय महिला जलतणपटू (जन्म: २४ सप्टेंबर १९४०)
१९८२: स्टॅनफोर्ड मूर - अमेरिकन बायोकेमिस्ट आणि शैक्षणिक - नोबेल पुरस्कार (जन्म: ४ सप्टेंबर १९१३)
१९७५: पं. विनायकराव पटवर्धन शास्त्रीय गायक (जन्म: २२ जुलै १८९८)

# IPL 2023 मुळे BCCI मालामाल, तब्बल ५,१२० कोटी रुपयांची रेकॉर्डब्रेक कमाई, पण GST तब्बल

इंडियन प्रीमियर लीगमुळे बीसीसीआयच्या कमाईत सातत्याने वाढ होत आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (BCCI) इंडियन प्रीमियर लीग २०२३ (IPL 2023) मधून ५१२० कोटी रुपयांहून अधिक कमावले आहेत. ही कमाई इंडियन प्रीमियर लीग २०२२ (IPL 2022) पेक्षा ११६ टक्क्यांनी जास्त आहे. आयपीएल २०२२ मध्ये बीसीसीआयने २,३६७ कोटी रुपये अधिक कमावले होते. तर बीसीसीआयने २०३८ कोटी रुपयांचा वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) भरला होता.

इकॉनॉमिक्स टाइम्सने दिलेल्या माहितीनुसार बीसीसीआयच्या २०२२-२३ च्या वार्षिक अहवालानुसार, आयपीएल २०२३ मधील एकूण उत्पन्न वार्षिक ७८ टक्क्यांनी वाढून ११,७६९ कोटी रुपये झाले आहे, तर खर्च ६६ टक्क्यांनी वाढून ६,६४८ कोटी रुपये झाला आहे. नवीन मीडिया हक्क आणि प्रायोजकत्व करारामुळे ही वाढ झाली. वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी राज्यसभेत माहिती दिली होती की बीसीसीआयने २०२३-२४ साठी २,०३८ कोटी रुपयांचा जीएसटी भरला.

बीसीसीआयची २०२३-२४ कमाई






इकॉनॉमिक टाइम्सच्या अहवालानुसार, बीसीसीआयला आयपीएल २०२३ मधून ५१२० कोटी रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न मिळाले.

आयपीएल २०२२ च्या तुलनेत ही कमाई ११६ टक्के अधिक आहे.

बीसीसीआयने आयपीएल २०२२ मधून २३६७ कोटी रुपये कमावले होते.

आयपीएल २०२३ मध्ये भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे एकूण उत्पन्न ११,७६९ कोटी रुपये होते.

या काळात बीसीसीआयच्या खर्चातही वाढ झाली आहे.

बीसीसीआयच्या २०२२-२३ च्या वार्षिक अहवालानुसार, खर्च देखील ६६ टक्क्यांनी वाढून ६६४८ कोटी रुपये झाला आहे.

बीसीसीआयच्या कमाईत वाढ होण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे नवीन मीडिया हक्क आणि प्रायोजकत्व करार.

नवीन मीडिया हक्क करार

२०२३ ते २०२७ सायकलसाठी ४८.३९० कोटी रुपयांचा नवीन मीडिया हक्क करार आयपीएल २०२३च्या सीझनपासून सुरू झाला. २०२१ मध्ये, डिस्ने स्टारने २३,५७५ कोटी रुपयांची बोली लावून २०२३-२७ साठी IPL चे टीव्ही हक्क जिंकले होते, तर Viacom 18 मालकीच्या Jio Cinema ने २३,७५८ कोटी रुपयांची बोली लावून डिजिटल मीडियाचे अधिकार जिंकले होते.

टायटल स्पॉन्सर

बीसीसीआयने पाच वर्षांच्या कालावधीसाठी टाटा सन्सला २,५०० कोटी रुपयांना आयपीएलच्या टायटलचे हक्क विकले. MyCircle11, RuPay, AngelOne आणि Ceat यांना सहयोगी प्रायोजकत्व विकून १,४८५ कोटी रुपये कमावले.

# लाडकी बहीण योजनेवर शिल्पा शेट्टीची पोस्ट, “मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी..





महाराष्ट्रात सध्या लाडकी बहीण योजनेची मोठ्या प्रमाणावर चर्चा आहे. राज्य सरकारने या योजनेसाठी पात्र ठरलेल्या महिलांच्या खात्यात तीन हजार रुपये जमा केले आहेत. आता लवकरच तिसरा हप्ताही जमा होणार आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेवर विरोधक टीका करत आहेत. ही योजना फक्त निवडणुकीपुरती आहे असं विरोधकांनी म्हटलं आहे. सुप्रिया सुळेंनी तर निवडणूक आल्यानंतर आणि लोकसभेचा निकाल आल्यानंतर राज्य सरकारला लाडकी बहीण आठवली असं म्हटलं आहे. तर संजय राऊत, उद्धव ठाकरेंनीही या योजनेवर टीका केली आहे. दरम्यान अभिनेत्री शिल्पा शेट्टीने ( Shilpa Shetty ) भाष्य केलं आहे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचं नाव घेत शिल्पाने यासंदर्भातली पोस्ट केली आहे. गेल्या आठवड्यात लाखो महिलांच्या बँक खात्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे ३ हजार रुपये जमा करण्यात आले आहेत. त्यामुळे ही योजना चर्चेत आहे. तसंच जास्तीत जास्त महिलांना या योजनेचा लाभ मिळावा म्हणून आतापर्यंत सरकारने या योजनेच्या नियमांत अनेक बदल केले आहेत.

# जय शाह आता ICC चे अध्यक्ष होणार, ‘या’ व्यक्तीने शर्यतीतून घेतली माघार

बीसीसीआयचे (BCCI) सचिव जय शाह हे आयसीसीचे म्हणजेच आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष होऊ शकतात, अशी चर्चा सुरू आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (ICC) विद्यमान अध्यक्ष ग्रेग बार्कले ३० नोव्हेंबर रोजी त्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर तिसऱ्या टर्मच्या शर्यतीपासून स्वतःला दूर केले आहे, ज्यामुळे बीसीसीआयचे सचिव जय शाह यांच्या अध्यक्ष होण्याबद्दल चर्चा वाढली आहे. आयसीसीच्या या पदासाठी जय शाह अर्ज भरणार की नाही हे २७ ऑगस्टपर्यंत स्पष्ट होईल, ही अध्यक्षपदासाठी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे. आयसीसी अध्यक्ष प्रत्येकी दोन वर्षांच्या तीन कार्यकाळासाठी पात्र असतात आणि न्यूझीलंडचे वकील बार्कले यांनी आतापर्यंत त्यांच्या कार्यकाळाची चार वर्षे पूर्ण केली आहेत. आयसीसीचे अध्यक्ष ग्रेग बार्कले यांनी बोर्डाला कळवले आहे की ते तिसऱ्या टर्मसाठी उभे राहणार नाहीत आणि नोव्हेंबरच्या अखेरीस त्यांचा सध्याचा कार्यकाळ संपल्यावर ते पद सोडतील, असे आयसीसीने प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. बार्कले यांची नोव्हेंबर




२०२० मध्ये आयसीसीचे स्वतंत्र अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. २०२२ मध्ये त्यांची या पदावर पुन्हा निवड झाली. CC नियमांनुसार, अध्यक्षपदाच्या निवडणुकीत १६ मते आहेत आणि आता विजेत्यासाठी नऊ मतांचे बहुमत (५१%) आवश्यक आहे. यापूर्वी अध्यक्ष होण्यासाठी विद्यमान उमेदवाराला दोन तृतीयांश बहुमत आवश्यक होते. आयसीसीने म्हटले आहे की, ‘विद्यमान संचालकांना आता २७ ऑगस्ट २०२४ पर्यंत पुढील अध्यक्ष पदासाठी अर्ज सादर करावे लागतील आणि जर एकापेक्षा जास्त उमेदवार असतील तर निवडणूक होईल आणि नवीन अध्यक्षांचा कार्यकाळ १ डिसेंबर २०२४ पासून सुरू होईल. ‘

## राशि भविष्य

**मेष** – तुमचा जबरदस्त लवचिकपणा आणि निडरपणा तुमच्या मानसिक ताकद अधिक वाढविणारा ठरेल. कोणतीही परिस्थिती ओढवली तरी अशी खंबीर भूमिका तुम्हाला ती परिस्थिती तुमच्या नियंत्रणात ठेवण्यासाठी सहाय्यकारी ठरेल. आज तुम्हाला कुणी अज्ञात स्रोताने पैसा प्राप्त होऊ शकतो ज्यामुळे तुमच्या बऱ्याच आर्थिक समस्या दूर होतील.

**वृषभ** – तुमच्यातील मूल जागे होईल आणि तुम्ही एकदम खेळीमेळीच्या मूडमध्ये जाल. शंकास्पद आर्थिक व्यवहारांमध्ये गुंतले जाणार नाही याची काळजी घ्या. संध्याकाळी तुमच्या मुलांबरोबर काही आनंदाचा काळ घालवा. तुमचे प्रियकर/प्रेयसी यांच्यावर तुम्ही हुकूमशाहीने गाजवू पाहाल तर खूप गंभीर समस्या उद्भवेल.

**मिथुन** – तुमच्या आकर्षक मनमोहक वागणुकीमुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल. अधिक काही खरेदी करण्यासाठी धावण्यापूर्वी तुमच्याकडे आधीपासून जी गोष्टी आहे ती वापरा. आपल्या कुटुंबियांच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत हे लक्षात ठेऊन आपल्या रागावर नियंत्रण ठेवा.

**कर्क** – कामाच्या ठिकाणचे वरिष्ठांचे दडपण आणि घरातील कलह तुमच्यावरील तणाव वाढवू शकतो. त्यामुळे कामावर लक्ष विचलित होईल. आज घरातून बाहेर जातांना मोठ्यांचा आशीर्वाद घेऊन निघा यामुळे तुम्हाला धन लाभ होऊ शकतो. आजच्या दिवशी कामाचा ताण कमी असेल, त्यामुळे तुम्ही कुटुंबासोबत चांगला वेळ घालवू शकाल.

**सिंह** – राग अनावर झाल्याने बाचाबाची आणि संघर्ष होऊ शकतो. आजचा दिवस जगून घेण्याच्या आणि करमणुकीवर अति खर्च करण्याच्या आपल्या स्वभावाचे परीक्षण करा तुमची अतिरिक्त ऊर्जा आणि प्रचंड उत्साह तुम्हाला सुयोग्य ठरतील असे निर्णय मिळतील आणि घरगुती तणाव सुकर करील.

**कन्या** – उत्तम विनोदबुद्धी ही तुमची मालमत्ता आहे आणि ती वापरून तुम्ही तुमचा आजार बरा करा. आज तुम्ही सहजपणे भांडवल उभे कराल - राहिलेली देणी परत मिळवाल - किंवा नवीन प्रकल्पांसाठी निधी मागाल. संध्याकाळपर्यंत खुशखबर अचानक मिळाल्याने तुमच्या कुटूंबात आनंदाचे वातावरण तयार होईल.

**तूळ** – दंतदुखी किंवा पोट बिघडण्यामुळे काही समस्या निर्माण होईल. ताबडतोब आराम पडावा यासाठी वैद्याकीय सल्ला घ्या. नव्या आर्थिक करारांना अंतिम स्वरुप मिळाल्यामुळे ताजा अर्थपुरवठा होईल. आपल्या उदार वागण्याचा फायदा मुलांना घेऊ देऊ नका. कामदेवाच्या कचाट्यातून सुटण्याची अगदी लहानशी संधी मिळेल.

**वृश्चिक** – चांगले इंटरेस्टिंग वाचन करून तुमच्या मनाला, विचारांना खाद्य पुरवा. आज तुम्ही आपल्या घरातील वरिष्ठ लोकांकडून पैश्याची बचत करण्याला घेऊन काही सल्ला घेऊ शकतात आणि त्या सल्ल्याला आयुष्यात महत्व ही देऊ शकतात. आपल्या उदार वागण्याचा फायदा मुलांना घेऊ देऊ नका.

**धनु** – स्वत:बद्दल छान वाटावे अशा गोष्टी घडण्याचा एकदम अद्भुत दिवस. आज घरातून बाहेर जातांना मोठ्यांचा आशीर्वाद घेऊन निघा यामुळे तुम्हाला धन लाभ होऊ शकतो. पालकांचे आरोग्य सुधारेल आणि ते तुमच्यावर प्रेमाचा वर्षाव करतील. प्रणयराधन आनंददायी आणि खूपच उत्साहाचे ठरेल.

**मकर** – तुम्ही सकारात्मक दृष्टिकोन आणि विश्वास यामुळे तुमच्या अवतीभवतीच्या लोकांवर प्रभाव पाडण्याची शक्यता आहे. जे लोक पैश्याला आतापर्यंत विनाकारण खर्च करत होते आज त्यांनी आपल्यावर काबू ठेवला पाहिजे आणि धनाची बचत केली पाहिजे. आपला काही वेळ इतरांना देण्यासाठी चांगला दिवस.

**कुंभ** – तुमचे मनमोकळे आणि निडर विचार तुमच्या मित्राला तुमचा गर्व आहे असे वाटून तो दुखावला जाईल. तुम्ही अतिशय उत्साहपूर्ण नवीन परिस्थितीचा अनुभव घ्याल - त्यामुळे तुम्हाला आर्थिक फायदा संभवतो. कामानिमित्त खाजगी कार्यक्रमांना जाण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे

**मीन** – तुमच्यातील मूल जागे होईल आणि तुम्ही एकदम खेळीमेळीच्या मूडमध्ये जाल. तुमच्या माता पक्षाने आज तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे. तुमचे मामा किंवा आजोबा तुमची आर्थिक मदत करण्याची शक्यता आहे. संध्याकाळी अचानक पाहुणे आल्याने घरात गर्दी होईल.

# आसाममध्ये बदलापूरसारखा उद्रेक; अल्पवयीन मुलीच्या छेडछाड प्रकरणात मारवाडी समाज लक्ष्य



**आसाम:** बदलापूर येथे दोन लहान मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्यानंतर मंगळवारी बदलापूर येथे मोठे आंदोलन उभे राहिले. काहीशी अशीच परिस्थिती आसाममधील शिवसागर शहरात पाहायला मिळाली. याठिकाणी एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग झाल्यामुळे मोठा संघर्ष निर्माण झाला. मुलीचा विनयभंग करणारा आरोपी हा मारवाडी समाजातील असल्यामुळे शहरात बाहेरचे विरुद्ध आसामी असा संघर्ष पेटल्याचे पाहायला मिळाले. आसामच्या उल्फा ULFA (I) या अतिरेकी संघटनेने मारवाडी समाज बाहेरचा असल्याचे सांगून त्यांच्याविरोधात आंदोलन छेडले. त्यानंतर मारवाडी समाजाने कॅबिनेट मंत्र्यासमोर गुडघे टेकून माफी मागितली.

सदर प्रकरण १३ ऑगस्ट रोजी घडले. त्यानंतर पोलिसांनी दोन आरोपींना अटक करून भारतीय न्याय संहिता आणि पोक्सो कायद्याअंतर्गत त्यांच्यावर गुन्हे दाखल केले. दोन्ही आरोपी हे स्थानिक व्यापारी समुदायाचे असल्यामुळे या घटनेचे पडसाद स्थानिक विरूद्ध बाहेरचे अशा स्वरुपात पाहायला मिळाले. शहरात बहुतेक दुकाने ही मारवाडी समाजाची आहेत. त्याचाही राग यानिमित्ताने व्यक्त करण्यात आला. आसामी राष्ट्रवादी संघटनेच्या ३० कार्यकर्त्यांनी सोमवारी आंदोलन केल्यामुळे बिगर आसामी व्यापाऱ्यांची दुकाने बंद ठेवण्यात आली.

या आंदोलनानंतर राज्याचे कॅबिनेट मंत्री आणि शिवसागर जिल्ह्याचे पालकमंत्री रनोज पेगू यांनी आसामीस राष्ट्रवादी संघटना आणि मारवाडी समूहाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत मारवाडी समाजाचे पुरूष आणि महिलांनी गुडघ्यावर बसून कॅबिनेट मंत्री पेगू, जिल्हा प्रशासन आणि आंदोलनकारी संघटनेची यांची माफी मागितली. तसेच माध्यमांसमोर जाहीर दिलगिरीही व्यक्त केली. त्यानंतर आंदोलकांना पान खायला देऊन प्रकरण मिटवले.

मारवाडी समाजाचे प्रतिनिधी विनोद अग्रवाल यांनी म्हटले की, आम्ही आसामी संघटनेच्या सर्व मागण्या मान्य केल्या आहेत. "आमचे प्रकरण आता मिटले आहे. मारवाडी समाजाने या घटनेचा निषेध केला असून पुन्हा या घटना घडणार नाहीत, असा शब्द दिला आहे. तसेच पीडित कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांच्याप्रती सहानुभूती व्यक्त केली आहे. तसेच आम्ही त्यांच्या मागण्याही मान्य केल्या आहेत", असेही विनोद अग्रवाल म्हणाले. तसेच पीडित मुलीच्या कुटुंबीयांना दोन लाखांची मदतही जाहीर करण्यात आली आहे.

कॅबिनेट मंत्री पेगू यांनी माध्यमांना माहिती देताना सांगितले की, आसामी संघटनेने जमीन, रोजगार आणि स्थानिक भाषेच्या हक्कासंदर्भात काही मागण्या आमच्यासमोर मांडल्या. मुख्यमंत्री हिंमता बिस्वा सर्मा यांच्या नेतृत्वाखाली आम्ही या मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहोत. दोन समाजामध्ये निर्माण झालेला विसंवाद आता दूर करण्यात आला आहे.

### आसामी संघटनेकडून तीन मागण्या

या बैठकीला उपस्थित असणाऱ्या सदस्यांनी द इंडियन एक्सप्रेसला माहिती देताना सांगितले की, आसामीस राष्ट्रवादी संघटनेकडून तीन प्रमुख मागण्या ठेवण्यात आल्या होत्या. पहिली मागणी म्हणजे, जिल्ह्यातील जमीन स्थानिकांशिवाय इतर कुणाला विकता येणार नाही, असा कायदा करावा. तसेच दुसरी मागणी म्हणजे, बिगर आसामी व्यावसायिकांनी त्यांच्या दुकानांच्या पाट्यावर आसामी भाषेत मोठ्या अक्षरात नाव लिहावे. तिसरी मागणी म्हणजे, बिगर आसामी व्यावसायिकांच्या उद्योगात ९० टक्के रोजगार स्थानिक युवकांना दिला पाहिजे.

# खालापूरात शिवसेनेच्या जनसंपर्क दौरा अभियानाला शिवसैनिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## आमदार महेंद्र थोरवे व कार्यकर्त्यांकडून विकास कामांचा आढावा घेण्यास सुरुवात






**वावोशी:-** कर्जत खालापूर मतदासंघांचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेचे खालापूर तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आज पासून खालापूर तालुक्यातील गाव खेड्याला भेट देत त्या विभागात झालेल्या विकास कामांचा तसेच प्रलंबित विकास कामांचा आढावा घेऊन शिवसैनिकांना योग्य मार्गदर्शन केले. शिवसेनेच्या वतीने हा जनसंपर्क दौरा असून या दौऱ्यामध्ये आमदार महेंद्र थोरवे स्वतः सहभागी होणार होते मात्र प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते आजच्या दौऱ्यात सहभागी होणार नसल्याचे सांगण्यात आले.

ते स्वतः या दौऱ्यात शिवसैनिकांच्या गाठीभेटी घेणार असल्यामुळे या दौऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आजपासून सुरू झालेला हा दौरा पुढे तीन दिवस चालणार असल्याची माहिती शिवसेनेकडून देण्यात आली आहे. या दौऱ्यामध्ये खालापूर तालुक्यातील दोन जिल्हा परिषद विभाग व खालापूर नगरपंचायत विभाग समाविष्ट करण्यात आलेला आहे. आमदार महेंद्र थोरवे यांनी मागील साडेचार वर्षाच्या कार्यकाळात केलेल्या विकास कामांचा आढावा घेणे व प्रलंबित विकास कामांच्या बाबत सकारात्मक दृष्टीने विचार विनिमय करण्यासाठी शिवसेनेच्या वतीने जनसंपर्क दौरा आयोजित करण्यात आला आहे.

■ शिवसेनेचे आमदार महेंद्र थोरवे यांचा हा जनसंपर्क दौरा असून या दौऱ्याच्या निमित्ताने ते खालापूर तालुक्यातील शिवसैनिकांच्या गाठीभेटी घेणार आहेत. या दौऱ्यात ते स्वतः शिवसैनिकांशी बोलून गावपातळीवरील झालेल्या विकासाची माहिती घेऊन प्रलंबित विकास कामांच्या बाबतीत चर्चा करणार आहेत. असे एकही गाव नाही जेथील शिवसैनिकांच्या गाठीभेटी घेणार नाहीत. सर्व शिवसैनिकांना आवर्जून ते भेटणार असल्याने शिवसैनिकांनी सुध्दा या दौऱ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना रायगड जिल्हा संपर्क प्रमुख विजय भाऊ पाटील यांनी केले आहे.

# 'वित्त विभाग फाईलवर ठाण मांडून बसतो' उच्च न्यायालयाचा संताप...

**नागपूर :** 'आम्ही बघतोय, वित्त विभाग प्रत्येकवेळी न्यायक्षेत्राशी संबंधित फाईलवर ठाण मांडून बसत आहे. हा फार गंभीर विषय आहे', अशा शब्दात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्या. नितीन सांबरे आणि न्या. अभय मंत्री यांनी वित्त विभागाला फटकारले. 'आम्ही तुम्हाला भरपूर संधी आणि वेळ दिला, तरी तुम्ही निर्णय घेत नाही. आता निवडणुका आल्यावर पुन्हा तुम्हाला 'बहाणा' मिळेल', असेही न्यायालयाने म्हटले. सोबतच वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांना एका आठवड्यात याबाबत स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले.उच्च न्यायालयात दाखल होणाऱ्या बहुतांश प्रकरणांमध्ये राज्य शासनाचे विभाग प्रतिवादी असतात. मात्र, सरकारी वकील कार्यालयात कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने शासकीय विभागांच्या शपथपत्रांचा मसुदा तयार करण्यास विलंब होतो. यामुळे प्रकरणे प्रलंबित राहतात, असे निरीक्षण न्यायालयाने मागील सुनावणीत नोंदवले होते.



# लाडकी बहीण अभियानासाठी शुक्रवारी नाशिक विभागातून ९०० बस

**नाशिक :** मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानातंर्गत शुक्रवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत येथे होणाऱ्या कार्यक्रमात ५० हजार लाडक्या बहिणींना सहभागी करण्यासाठी तब्बल ९०० बसेसचा वापर करण्यात येणार आहे. यामुळे नाशिकसह धुळे, जळगाव आणि अहमदनगर या जिल्ह्यांतून बसेस मागविल्या जाणार आहेत. त्यामुळे संबंधित जिल्ह्यातील प्रवासी, पासधारक विद्यार्थ्यांची दैनंदिन वाहतूक कोलमडण्याची शक्यता आहे. पंचवटीतील तपोवन मैदानात लाडकी बहीण योजनेचा कार्यक्रम होत आहे. भव्य जलरोधक तंबू उभारण्यात येत आहे. या कार्यक्रमात जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातून ५० हजार लाडक्या बहिणींना निमंत्रित करण्यात आले आहे. तालुकानिहाय बहिणींच्या वाहतुकीसाठी राज्य परिवहनच्या ७०० आणि शहरातील बहिणींसाठी नाशिक परिवहन महामंडळाच्या (सिटीलिंक) २०० अशा एकूण ९०० बस सज्ज ठेवल्या जातील. राज्य परिवहन नाशिकमधून २५० आणि शेजारील अहमदनगर, धुळे, जळगाव जिल्ह्यातून उर्वरित ४५० बसेस मागविण्यात येत आहेत. नाशिक मनपा परिवहन महामंडळ अर्थात सिटीलिंक आपल्या ताफ्यातील ८० टक्के बस उपलब्ध करत आहेत. यामुळे शुक्रवारी नाशिक शहरासह ग्रामीण भागातील बससेवा विस्कळीत होण्याची दाट शक्यता आहे. कमी-अधिक प्रमाणात धुळे, जळगाव अहमदनगरमध्येही बसेसची कमतरता जाणवणार आहे. लाडक्या बहीण कार्यक्रमाची झळ जिल्हांतर्गत आणि लांब पल्ल्याच्या बससेवेला बसणार असल्याचे चित्र आहे.



मनपा सिटीलिंक बस सेवेतून दररोज एक लाख जण प्रवास करतात. यामध्ये २६ हजार पासधारक विद्यार्थी आहेत. २५० पैकी २०० बसेस लाडक्या बहीण कार्यक्रमासाठी वापरल्या जातील. कार्यक्रम संपल्यानंतर बहिणींना पुन्हा घरी सोडले जाणार असल्याने त्या बस लगेचच प्रवासी सेवेत वापरता येणार नाहीत, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मान्य केले.

# Investment trainer in Pune duped of Rs 35 lakh in share trading cyber fraud

**Pune** - A 45-year-old engineer from Pune allegedly lost Rs 35 lakh in an online share trading fraud. The police said cyber criminals promised him high returns through institutional investments and initial public offerings (IPOs). The engineer who takes online classes about share market investments registered a complaint earlier this week. In April, he joined a WhatsApp group where members and administrators discussed different stock investment options and the high returns they were getting. Later, one of the administrators contacted him in a private chat and asked him to share screenshots from his Demat account and a list of his shareholdings. The administrator began sending him messages about certain stocks and how investing in them would lead to higher gains. He was asked to download a phone-based investment application, which the investigation later found to be fraudulent. Instead of using a Demat account for the investment, he was instructed to send money to private bank accounts registered in different locations in India.

# Delhi Police Bust 'Al-Qaeda Terror Module Aspiring To Declare Khilafat', 14 Detained



**Delhi** - The Delhi Police said on Thursday that they have busted an al-Qaeda terror module. According to a report by PTI, 14 people from Jharkhand, Rajasthan and Uttar Pradesh have been detained.

"The module, as per current state of operations, was being led by one Dr Ishtiyaq of Ranchi (Jharkhand), and it was aspiring to declare 'khilafat (Caliphate)' and execute serious terrorist activities within the country," the Delhi Police said in a statement. It also said the members of the terror module were trained, including in handling weapons, at various locations.

Officials said that the operation was conducted along with the police forces of the states concerned after they received intelligence about the module.

The Delhi Police statement said six people had been detained from Bhiwadi in Rajasthan while they were undergoing training to handle weapons, and eight from Jharkhand and Uttar Pradesh for questioning.

PTI reported that the detainees are being interrogated and additional detentions are anticipated. Raids are also being conducted to recover arms, ammunition and documents.

# Bomb threat on Air India flight from Mumbai, full emergency declared at Thiruvananthapuram airport



**Mumbai** - The Thiruvananthapuram International Airport Thursday was put under full emergency after an Air India flight from Mumbai received a bomb threat, airport sources told news agency PTI. As the flight approached Thiruvananthapuram airport, the pilot informed about the bomb threat at 7:30 am, and after landing at the airport around 8 am, the aircraft was moved to an isolation bay.

According to PTI, a "Bomb in flight" message — written on a tissue paper — was found in the washroom of the plane.

There were 135 passengers onboard and they were evacuated by 8:44 am. Information on the origin of the threat and other details are not known yet. A police probe into the matter is underway. The aircraft was also being inspected by security agencies, including a bomb detection squad, PTI reported.

While passengers await for their luggage to be delivered, the aircraft is currently being examined by security agencies. In a statement, the airline company said that a specific security alert was detected on flight AI 657 during cruise from Mumbai to Thiruvananthapuram and "the crew carried out all the laid down security drills keeping passenger safety as top priority." "All passengers and crew disembarked safely. Air India accords top priority to the safety of its passengers and crew," an airline spokesperson was quoted as saying by PTI. "There has been no impact on life. Airport operations are currently uninterrupted," sources said.

# कंत्राटी वीज कामगारांचा संपाचा इशारा, यंत्रणा कोलमडण्याचा धोका

**नागपूर :** राज्यातील कंत्राटी कामगारांच्या विविध संघटना आणि ऊर्जा विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची मंगळवारी मुंबईत झालेली बैठक निष्फळ ठरली. त्यामुळे संघटनांनी बेमुदत संपाचा इशारा दिला.

महावितरण, महापारेषण, महानिर्मितीमध्ये मागील १० ते १५ वर्षांपासून सुमारे ४५ हजार कंत्राटी कामगार सेवा देत आहेत. सेवा कायम करा, मूळ वेतनात वाढ करा, रोजंदारी कामगार म्हणून समावून घ्या, वयाच्या ६० वर्षांपर्यंत रोजगाराच्या शाश्वती द्या, या मागण्यांसाठी ते सतत आंदोलन करीत आहेत. या मुद्यावर बऱ्याचदा संपही केला गवला. परंतु प्रशासन लक्ष देत नाही. दरम्यान कंत्राटी कामगारांच्या मुद्यावर विविध संघटनांची कृती समितीही गठीत झाली होती. कामगार संघटनांनी आंदोलनाची नोटीसही दिली आहे.

या पार्श्वभूमीवर २० ऑगस्टला प्रधान ऊर्जा सचिव आभा शुक्ला, तिन्ही कंपन्यांचे अध्यक्ष आणि कंत्राटी कामगार संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची मुंबईत एक महत्वाची बैठक झाली. त्यात वर्कर्स फेडरेशनकडून कृष्णा भोयर, एस.आर. खातीब, दत्ता पाटील,



भारतीय मजदूर संघाकडून नीलेश खरात यांनी कंत्राटी कामगारांची भूमिका मांडली. यावर आभा शुक्ला यांनी कंत्राटी कामगारांना रोजंदारी कामगार म्हणून समावून घेता येत नसल्याचे बैठकीत स्पष्ट केले. त्यावर कामगार संघटनांनी तामिळनाडू, हिमाचल, तेलंगणा, ओडिशा, गोवा राज्यात वीज उद्योगातील कामगारांना कायम केल्याचे सांगितले. परंतु ऊर्जा सचिवांनी असा निर्णय महाराष्ट्रातील वीज कंपन्यांना घेता येणार नसल्याचे स्पष्ट केल्याची माहिती फेडरेशनचे कृष्णा भोयर यांनी दिली. ऊर्जा सचिवांनी रानडे कमेटीचा अहवालाचा दाखला देत कंत्राटी कामगारांना सेवेत समावून घेता येत नसल्याचे सांगितले. त्यावर संघटनांनी नाराजी व्यक्त केली. शासनाची ही भूमिका कामगार विरोधी असल्याचे यावेळी संघटनांकडून सांगण्यात आहे. त्यानंतर ही बैठक निष्फळ ठरल्याचे कामगार संघटनांकडून सांगण्यात आहे.

ऊर्जा खात्यासह तिन्ही वीज कंपन्यांच्या व्यवस्थापनाने कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावर घेतलेल्या नकारात्मक भूमिकेशी वर्कर्स फेडरेशन सहमत नाही. कंत्राटी कामगारांच्या मागण्यांना वर्कर्स फेडरेशनचे समर्थन आहे. त्यामुळे संपालाही पाठिंबा असेल. -मोहन शर्मा, अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन.

कंत्राटी कामगारांच्या प्रश्नांशी ऊर्जा खात्याला काहीही देणेघेणे नसल्याचे बैठकीत स्पष्ट झाले. त्यामुळे भारतीय मजदूर संघाच्या अखत्यारित असलेल्या महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाकडून २४ ऑगस्टला नागपुरातील रेशीमबाग मैदान ते ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घरापर्यंत मोर्चा काढला जाईल. कामगारांवर अन्याय सहन केला जाणार नाही.

# सायबर चोरट्यांकडून संगणक अभियंत्याची एक कोटींची फसवणूक



**पुणे :** शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने सायबर चोरट्यांनी संगणक अभियंत्याची एक कोटी १५ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याबाबत एका ४५ वर्षीय तक्रारदाराने सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार चोरट्यांविरुद्ध माहिती-तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार धायरी भागातील एका सोसायटीत राहायला आहेत. ३० जून रोजी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर सायबर चोरट्यांनी एक लिंक पाठविली. संगणक अभियंत्याने लिंक उघडून पाहिली. त्यानंतर त्यांचा शेअर बाजारविषयक माहिती देणाऱ्या समुहात समावेश करण्यात आला. समुहाचा प्रमुख रजत चोप्रा नावाच्या चोरट्याने त्यांना शेअर बाजारातील गुंतवणूक विषयक योजनांची माहीती दिली. त्यानंतर त्यांना एक उपयोजन (ॲपस्टॉक) मोबाइलवर उघडण्यास सांगितले. त्यामाध्यमातून त्यांनी वेळोवेळी एक कोटी १५ लाख ४४ हजार रुपये चोरट्यांच्या खात्यात जमा केले.

# ४ वर्षांच्या मुलींनाही सोडलं जात नाहीये, ही काय स्थिती आहे?






● मुंबई, (प्रतिनिधी) :

बदलापूरमध्ये दोन लहानग्या मुलींवर लैंगिक अत्याचाराची घटना उघड झाल्यानंतर त्यावर संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. समाजाच्या सर्वच स्तरातून यावर संताप व्यक्त होत असून आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी केली जात आहे. बदलापूर रेल्वे स्थानकावर तब्बल १० तास या मागणीसाठी रेलरोकोही करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणाची स्यूओमोटो दखल घेतली असून त्यासंदर्भात आज पहिली सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने बदलापूर पोलिसांनी तपासात केलेल्या अक्षम्य चुकांवर बोट ठेवत परखड शब्दांत ताशेरे ओढले आहेत. लाईव्ह लॉनं यासंदर्भात त्यांच्या एक्स अकाऊंटवर सविस्तर माहिती दिली आहे.

आज सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे व न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने बदलापूर पोलिसांनी तपासात केलेल्या चुकांवर बोट ठेवलं. सरकारी पक्षाकडून वकील हितेन वेनेगावकर बाजू मांडत होते. त्यांना न्यायालयाने परखड शब्दांत सुनावलं आहे. "जर शाळामध्येच मुली सुरक्षित नसतील, तर मग शिक्षण अधिकाराचा काय उपयोग आहे? अगदी ४ वर्षांच्या मुलीही बळी पडत आहेत. ही काय परिस्थिती आहे? हे प्रचंड धक्कादायक आहे", असं न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे यांनी नमदू केलं. दरम्यान, पोलिसांनी गुन्हा नोंद करण्यात दाखवलेल्या दिरंगाईवर न्यायालयानं कठोर शब्दांत ताशेरे ओढले. "फक्त गुन्हा दाखल करण्यातच दिरंगाई केली असं नाहीये. शाळा प्रशासनानंही हा प्रकार उघड झाल्यानंतर त्यासंदर्भात तक्रार दाखल केली नाही. एफआयआरच्या कॉपीवरून हे लक्षात येत आहे. फक्त एकाच पीडितेचा जबाब नोंदवण्यात आला आहे. शिवाय जेव्हा आम्ही दुसऱ्या पीडित मुलीचा जबाब नोंदवला का? असं विचारल्यानंतर बचाव पक्षानं तो आज नोंदवला जाणार आहे असं सांगितलं", असं खंडपीठानं सुनावलं.

# राज्यस्तरीय कृषि महोत्सव'चे दिमाखदार उद्घाटन आता राज्यात लाडका शेतकरी अभियान -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## ■ सोयाबीन, कापूस अनुदानासाठी ई-पीक पाहणीची अट रद्द

● बीड, (प्रतिनिधी) :

लाडकी बहीण व लाडका भाऊ नंतर आता आपला अन्नदाता असणाऱ्या शेतकऱ्याच्या लाभाच्या सर्व योजना राबवून लाडका शेतकरी अभियान राज्यात सुरु करण्यासोबतच सोयाबीन व कापसाला हेक्टरी पाच हजार रुपये मदत देण्याबाबतची ई पिक पाहणीची अट रद्द करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परळी वैजनाथ येथील राज्यस्तरीय कृषि महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी केली. परळी येथील स्व. पंडीतअण्णा मुंडे सभामंडप कृषि उत्पन्न बाजार समिति येथे दिमाखदार सोहळ्यात पाच दिवसीय कृषि महोत्सव २०२४ चे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे, राज्य कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल तसेच विधानपरिषद सदस्या आमदार पंकजा मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते रिमोटद्वारे नमो शेतकरी महासन्मान योजनेचा चौथा हप्ता राज्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात डीबीटीद्वारे जमा करण्यात आला. तसेच सोयाबीन, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना पाच हजार रुपये अनुदान वितरीत करण्यासाठी वेबपोर्टलही मान्यवरांच्या हस्ते कार्यान्वित करण्यात आले. कृषि विभागाच्या विविध योजनांच्या माहितीचा समावेश असलेल्या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले. यासोबतच परभणी येथील वसंतराव नाईक कृषि विद्यापीठाने




तयार केलेल्या एकात्मिक कीड रोग व्यवस्थापन पुस्तिकेचेही यावेळी प्रकाशन करण्यात आले. पाच दिवसीय या कृषि महोत्सवात कृषि साहित्य प्रदर्शनासोबतच पशुप्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत येणाऱ्या पाच दिवसात विविध विषयांवर परिसंवाद, चर्चासत्र होणार आहे. तसेच याठिकाणी धान्य महोत्सव, रानभाजी महोत्सव होणार आहे. प्रदर्शनात महिला बचतगटांसाठी साहित्य विक्रीची दालने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. कृषि अवजारांचा स्वतंत्र विभाग देखील याठिकाणी आहे. या पाच दिवसीय महोत्सवाला किमान पाच लाख शेतकरी भेट देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. राज्यातील सरकार हे शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देणारे असून आतापर्यंत नैसर्गिक आपत्तीच्या काळात हे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहे. एनडीआरएफचे निकष बाजूला ठेवून दुप्पट नुकसानभरपाई देण्याचा निर्णय शासनाने घेतला. गतवर्षी सोयाबीन, कापूस पिकाला कमी दर मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी पाच हजार रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतला. यासाठी आवश्यक ई-पीक पाहणी अहवाल अनेक शेतकऱ्यांकडे उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले असल्याने आता ई-पीक पाहणी अहवालाची अट शिथिल करून सातबारा उताऱ्यावरील नोंदीनुसार अनुदान वाटप करण्यात येईल, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले. 'मुख्यमंत्री -माझी लाडकी बहीण' योजनेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यासोबतच लाडक्या भावांना विद्यावेतन देण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आणली. आता याच धर्तीवर विविध लाभांच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी लाडका शेतकरी अभियान सुरु करण्याची घोषणा मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केली. याची सुरुवात आज नमो शेतकरी महासन्मान योजनेचा दोन हजार रुपयांचा चौथा हप्ता शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करून होत असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांना केवळ १ रुपया विमा हप्ता भरून प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ देणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य असून साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषिपंपांना मोफत वीज देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

# जेईई, 'नीट'साठी मोफत प्रशिक्षण




● नागपूर, (प्रतिनिधी) :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणेमार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील उमेदवारांना बार्टीमार्फत जेईई, नीट परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने मुंबई, पुणे, नाशिक, छ. संभाजीनगर, लातूर व नागपूर या ठिकाणी प्रत्येकी जेईई प्रशिक्षणासाठी १०० व नीट प्रशिक्षणासाठी १०० विद्याथ्यर्थ्यांची निवड करण्याकरिता बार्टीमार्फत १३ जुलै २०२४ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. प्रशिक्षणासाठी विद्यार्थी अकरावी(विज्ञान) शाखेत प्रवेश घेतलेला असावा. विद्यार्थ्याजवळ महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा व अधिवास दाखला असावा. कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखाच्या घरात असावे. विद्यार्थी दिव्यांग असल्यास ४० टक्के पेक्षा जास्त दिव्यांगत्व असल्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करावी. जेईई आणि नीट प्रवेश परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी नमुद केल्याप्रमाणे महिला ३० टक्के, दिव्यांग ५ टक्के, अनाथ १ टक्के, वंचित ५ टक्के जागा आरक्षित असतील.

# जळगावच्या केळीचा इराणमध्ये डंका!

● जळगाव, (प्रतिनिधी) :

जळगावची केळी ही महाराष्ट्रात सर्वात लोकप्रीय समजली जाते. दर्जेदार उत्पन्नासह देशातच नाही पण परदेशातही निर्यात करण्यावर शेतकरी भर देत असल्याचं दिसतं. आता जळगावच्या भडगाव तालुक्यातील एका शेतकऱ्यानं केळीची निर्यात करत लाखोंमध्ये नफा कमावलाय. राजेंद्र पाटील या शेतकऱ्याच्या शिवारातल्या केळीचा डंका आता आखाती देशात वाजतोय. इराणमध्ये निर्यात करत एकरी अव्वल उत्पादन त्यांनी घेतलंय. त्यांच्या एका केळीच्या घडाचं वजन तब्बल ३५ किलो आहे. एरवी प्रतिक्विंटल १२०० ते १४०० रुपयांचा भाव केळीला मिळत असताना निर्यात करत क्विंटलमागे तब्बल १७५० रुपयांचा भाव त्यांना मिळतोय.

तंत्रज्ञानाचा योग्य वापर करत फळबागा जपणं तसं कठीण काम. बदलत्या हवामानात टिकाव



## केळीचा घड ३५ किलोंचा!

साधारणपणे केळीच्या सामान्य घडाचं वजन २० ते २५ किलो एवढे असते. पण आधुनिक पद्धतीने आणि तंत्रज्ञानाचा वापर करत नियोजन साधल्याने या शेतकऱ्याच्या केळीच्या एका घडाचे वजन तब्बल ३५ किलोंचे भरले आहे. त्यामुळेच या केळीला चांगला भाव मिळाल्याचे सांगण्यात येत आहे.

धरत भरघोस उत्पन्न मिळवत या शेतकऱ्याने लाखो रुपयांचा नफा मिळवल्याचं दिसतंय.

जळगाव केळीचं आगार समजलं जातं. पाण्याचं योग्य नियोजन करत जवळपास सर्वच तालुक्यांमध्ये कमी अधिक प्रमाणात केळीचं उत्पादन घेतलं जातं. गिरणा नदीच्या पाण्यानं समृद्ध असणाऱ्या पाचोरा आणि भडगाव परिसरात केळीचं पीक मोठ्या प्रमाणावर घेतात. याच भडगाव तालुक्यातील राजेंद्र पाटील या केळी उत्पादक शेतकऱ्यानं आपली केळी थेट इराणला निर्यात करत चांगला नफा कमावलाय. साधारण ३५ ची रास त्यांच्याकडे असून प्रतिक्विंटल १७५० रुपयांचा नफा त्यांना मिळाला आहे.

## परदेशी निर्यात करत लाखात कमाई

राजेंद्र पाटील यांची सहा एकर शेती असून त्यांनी ९००० टिश्यूकल्चर केळीच्या रोपांची लागवड केली आहे. सध्या त्यांच्या शेतात केळीची काढणी सुरु असून देशांतर्गत आणि परदेशीही ते केळी पाठवतात. इराणमध्ये राजेंद्र पाटील यांच्या केळीला वाव मिळाला असून त्यांना भरघोस उत्पन्न घेतलं आहे. केळीला साधारणपणे १२०० ते १४०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळत असताना १७०० रुपयांचा भाव त्यांना मिळाल्यानं विक्रमी कमाई त्यांनी केल्याचं बोललं जातंय. खत, मशागत आणि पाण्याचे व्यवस्थापन करत भडगाव तालुक्यातून इराणला निर्यात करत केळीतून त्यांनी विक्रमी कमाई केली आहे.

# मणिपूर इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीनी 'युजीसी'ची परवानगी घेऊन सुधारित प्रस्ताव सादर करावा -उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या सूचना



● मुंबई, (प्रतिनिधी) :

मणिपूर इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी हे स्वायत्त विद्यापीठ आहे. महाराष्ट्रात आदिवासी भागात कौशल्य निर्मितीवर आधारित शैक्षणिक अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आवश्यक त्या सर्व परवानगी घेऊन विद्यापीठाने सुधारित प्रस्ताव सादर करावा, अशा सूचना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केल्या. मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मणिपूर विद्यापीठ संदर्भात ऑनलाईन बैठक झाली. बैठकीला उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, उपसचिव अशोक मांडे,उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर,(ऑनलाइन) मणिपूर विद्यापीठाचे कुलगुरू हरिकुमार पल्लाथाडका(ऑनलाइन) उपस्थित होते. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, हा अभ्यासक्रम सुरू करण्यापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार नॅक मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी तसेच विद्यापीठाने नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ रँकिंग फ्रेमवर्कतर्फे प्रकाशित होणाऱ्या अहवालात विद्यापीठाचा समावेश असावा यासाठी प्रयत्न करावे. त्याचबरोबर इतर राज्यात शैक्षणिक शाखा सुरू करण्यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आवश्यक त्या सर्व परवानगी घ्यावी,आणि सुधारित प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवावा. राज्य शासन याबाबत सर्वतोपरी सहकार्य करेल, असेही श्री. पाटील यांनी यावेळी सांगितले.

# जागतिक विश्वविक्रम मोडणाऱ्या गोविंदा पथकास रोख २५ लाखाचे पारितोषिक




● ठाणे, (प्रतिनिधी) :

दहीहंडी अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. दरवर्षी प्रमाणे यावर्षी ही दहीहंडी सण मोठ्या उत्साहात, जल्लोषात साजरा करण्यात येणार आहे. यंदा पहिले नऊ थर लावणाऱ्या गोविंदा पथकास ११ लाखांचे बक्षीस देण्यात येणार आहे. तसेच रोख रक्कम, आकर्षक सन्मान चिन्ह देऊन या गोविंदांना गौरविण्यात येणार आहे. त्याचबरोबर या दहीहंडीसाठी कलाकार आणि राजकीय नेते देखील या दहीहंडीला उपस्थित असणार आहे. देशासह महाराष्ट्रात महिला अत्याचारांच्या घटना वाढत आहे. या घटनांना पायबंद घालण्यासाठी २०१९ मध्ये नागपूर हिवाळी अधिवेशनात भारतीय दंड संहिता, १८६० आणि फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मध्ये सुधारणा करण्याचे विधानसभेत विधेयक क्र. ५० आमदार प्रताप सरनाईक यांनी मांडले होते. आंध्रप्रदेश राज्याने भारतीय दंड सहितेच्या कलम ३७६ व ३७६ अ मध्ये दुरुस्ती केली आहे. त्यानुसार महिलांवर अत्याचार करणाऱ्या आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध झाल्यावर तात्काळ शिक्षा देण्याची तरतूद केली आहे. महिलेची तक्रार दाखल झाल्यावर पोलिसांनी प्रकरणाचा ७ दिवसात तपासात पूर्ण करणे. न्यायालयाने १४ दिवसात सुनावणी पूर्ण करायची आहे आणि न्यायालयात गुन्हा सिद्ध झाल्यास २१ दिवसाच्या आत आरोपीस शिक्षा देऊन सदर प्रकरण निकाली काढायचे आहे. अशी तरतूद सदर सुधारित कायद्यात अंतर्भूत आहे. महिलांवरील अत्याचारी आरोपीस विहित मुदतीत म्हणजे २१ दिवसाच्या आत शिक्षेची कायदेशीर तरतूद करणारे देशातील पहिले राज्य आहे. आंध्रप्रदेशच्या धरतीवर महाराष्ट्रातही असा कायदा लागू करण्यात यावा, अशी मागणी आमदार प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषदेत केली. या विधेयकाची प्रत दहीहंडीच्यादिवशी मोठ्या स्क्रीन लावण्यात येणार आहे. याबाबतची जनजागृती दहीहंडी महोत्सवाच्या माध्यमातून केली जाईल. हीहंडी उत्सवाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ठाण्यातील वर्तक नगर येथील संस्कृतीची विश्वविक्रमी दहीहंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या दहीहंडी उत्सवात ९ थर लावणाऱ्या गोविंदा पथकास ५ लाख व आकर्षक ट्रॉफी, ८ थर लावणाऱ्या गोविंदा पथकास २५ हजार व आकर्षक ट्रॉफी, ७ थर लावणाऱ्या गोविंदा पथकास १५ हजार व सन्मानचिन्ह, ६ थर लावणाऱ्या गोविंदा पथकास १० हजार व सन्मानचिन्ह, ५ थर लावणाऱ्या गोविंदा पथकास ५ हजार व सन्मानचिन्ह तसेच मुंबई, ठाणे येथील महिलांचे गोविंदा पथकाला सुद्धा विशेष मान देण्यात येणार असून त्यांच्यासाठीही विशेष पारितोषिक ठेवले आहे. आमदार प्रताप सरनाईक यांच्या ठाण्यातील संस्कृती युवा प्रतिष्ठानतर्फे यावर्षी जागतिक विश्वविक्रम मोडणाऱ्या गोविंदा पथकास २५ लाखाचे बक्षीस जाहीर केले आहे. यंदा प्रो गोविंदा सीझन २ देखील मोठ्या उत्सहात आणि दिमाखात पार पडला. गोविंदा हा खेळ मातीपासून ते मॅटपर्यंत पोहचला आणि अपघाताचे सत्र थांबले जावे हा प्रो. गोविंदामागील उद्देश आहे, असे आमदार प्रताप सरनाईक यांनी सांगितले. तसेच राज्य शासनाने गोविंदा खेळाचा क्रीडा प्रकारात समावेश केला आहे. दा गोपाळकाल्याला सार्वजनिक सुट्टी देखील जाहीर करण्यात आली आहे. गोविंदांच्या काळजी पोटी शासनातर्फे ७५ हजार गोविंदांचा मोफत विमा काढण्यात येत आहे. यंदाचा गोविंदा अपघात मुक्त व्हावा यासाठी प्रयत्न करूया, असे आवाहन आमदार प्रताप सरनाईक यांनी केले.

# रत्नागिरी पाली येथे बिबट्याच्या हल्ल्यात वृद्ध महिला गंभीर जखमी

● रत्नागिरी, (प्रतिनिधी) :

तालुक्यातील पाली-पाथरट येथे गुरुवारी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास पाली पाथरट मावळटवाडी येथे राहणाऱ्या इंदिरा शांताराम धाडवे (वय ७५) यांच्यावर दडी मारून बिबट्याने जीवघेणा हल्ला केला. बिबट्याच्या हल्ल्यात इंदिरा धाडवे या गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर पाली येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याविषयी मिळालेल्या माहितीनुसार, इंदिरा धाडवे यांचा मुलगा सुभाष बाजूला चुलीजवळ पाणी तापवत बसला होता म्हणून त्या वाचल्या. त्याने तत्काळ पेटलेले लाकूड घेऊन धाव घेतल्याने बिबट्या पळून गेला. दरम्यान बिबट्याच्या हल्ल्यात इंदिरा धाडवे या गंभीर जखमी झाल्या असून त्यांना पाली येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सुदैवाने मुलगा आणि इतर माणसे बाजूलाच असल्यामुळे इंदिरा धाडवे यांचा जीव वाचला. मागील दोन वर्षांपासून बिबट्याचा वावर या भागात आहे हे निदर्शनास आणूनसुद्धा वनविभाग याकडे दुर्लक्ष करत आहे.

# शालेय परिसरात मुलींवरील अत्याचाराला प्रतिबंधासाठी शासन व समाजाच्या सहभागाची आवश्यकता -उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे

● मुंबई, (प्रतिनिधी) :

मुलींच्या सुरक्षेत वाढ करण्यासाठी विविध उपाययोजना आखण्यासंदर्भात शालेय शिक्षण, गृह विभाग, उच्च व तंत्र शिक्षण, परिवहन, सामाजिक न्याय, नगरविकास, आदिवासी विभागाशी समन्वय साधून कार्यवाही करणार असल्याचे उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले. भविष्यात अशा घटना घडू



नये यासाठी शासन कार्यरत असून समाजाच्या सहकार्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

बदलापूर येथे दोन चिमुकल्या मुलींवर शाळेमधील स्वच्छता रक्षकाने अत्याचार केल्याचे समजताच उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी बदलापूरला भेट दिली. पॉक्सोच्या संदर्भातल्या ज्या मुलींच्या केसेस आहेत, त्याच्यात मुलींच्या वयानुसार त्यांच्याशी संवेदनशील पद्धतीने बोलून तक्रार नोंदवण्यासाठी विविध वयाच्या मुलीच्या परिस्थितीनुसार त्याचे एसओपी व त्याच्यावर पुनर्विचार करणे गरजेचे असल्याचे उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

# MPSC ची २५ ऑगस्टला होणारी परीक्षा लांबणीवर.. कधी होणार परीक्षा?

● पुणे, (प्रतिनिधी) :

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) २५ ऑगस्टला होणाऱ्या परीक्षेत कृषी विभागाच्या २५८ पदांचा समावेश करण्याची मागणी करत स्पर्धा परीक्षार्थींनी मंगळवारी रात्री सुरू केलेले ठिय्या आंदोलन बुधवारीही सुरू ठेवले. खासदार सुप्रिया सुळे यांनी आंदोलकांची भेट घेऊन त्यांना पाठिंबा दिला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमपीएससीच्या अध्यक्षांना या बाबत सकरात्मक निर्णय घेण्याची विनंती केली आहे. त्यानंतर आता आज (२२ ऑगस्ट) सकाळी दहा वाजता एमपीएससीची




बैठक झाली.

एमपीएससीतर्फे राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा २५ ऑगस्ट रोजी होत आहे. कृषी सेवेतील २५८ पदांचा समावेश याच परीक्षेत करण्याची स्पर्धा परीक्षार्थींची मागणी आहे. मात्र या परीक्षेसंदर्भात २९ डिसेंबर, २०२३ रोजी जाहिरात प्रसिद्ध होईपर्यंत एमपीएससीकडे महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा २०२४ साठीचे मागणीपत्र शासनाकडून प्राप्त झाले नाही. त्यामुळे कृषी सेवेतील पदांचा समावेश जाहिरातीमध्ये करणे शक्य झाले नाही. आता या परीक्षेची तयारी झाली असून, कृषी सेवेच्या मागणीपत्रातील पदांच्या भरती प्रक्रियेबाबत पुढील नियोजन लवकरात लवकर करण्यात येईल, असे परिपत्रक एमपीएससीने मंगळवारी प्रसिद्ध केले.

या पार्श्वभूमीवर स्पर्धा परीक्षार्थींनी आक्रमक भूमिका घेत मंगळवारी रात्रीपासून शास्त्री रस्ता येथे ठिय्या आंदोलन सुरू केले. खासदार सुप्रिया सुळे यांनी या आंदोलकांची भेट घेऊन त्यांना पाठिंबा दिला. दोन्ही परीक्षा एकाच दिवशी आल्यामुळे दोन्ही परीक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांना एका परीक्षेला मुकावे लागणार आहे. त्यामुळे विद्यार्थी विविध माध्यमांतून शासनाकडे पाठपुरावा करत आहेत. शासनाने त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले आहे. महाराष्ट्र कृषी सेवा गट अ, ब आणि ब (कनिष्ठ) संवर्गासाठीची परीक्षा ऑक्टोबरमध्ये घेण्यात येणार असल्यास ही पदे राज्यसेवा परीक्षेमध्ये समाविष्ट करून ऑक्टोबरमध्ये एकत्रित सर्वसमावेशक राज्यसेवा परीक्षा घेणे शक्य आहे आणि तांत्रिकदृष्ट्या तेच योग्य आहे, असे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. विद्यार्थ्यांच्या रास्त मागण्यांची दखल घेऊन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला योग्य ते निर्देश देऊन तातडीने परिपत्रक जाहीर करण्याची मागणी सुळे यांनी केली.